# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ / पौष ७, १९४३ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | मुख्यमंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री | |
| (३) | गृहनिर्माण मंत्री | |
| (४) | नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७५**

---

### राज्याच्या शासकीय नोकर भरतीसंदर्भात सामाजिक व समांतर आरक्षण व अन्य बाबींकरिता नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालाबाबत

**(१) * ३२५२० श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या शासकीय सेवांमध्ये नोकर भरती करताना देण्यात येणारे विविध संदर्भ, सामाजिक आरक्षण तसेच समांतर आरक्षण निश्चित करण्यासाठी शासनाने प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली असल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील विविध बाबींसह आरक्षणासंदर्भात दाखल झालेले विविध दावे, याचिका व शासनाने त्यासंदर्भात काढलेल्या विविध आदेशांचा अभ्यास करणे तसेच मा.न्यायालयांच्या आदेशानुसार शासन निर्णयात कोणते बदल करणे आवश्यक आहे या बाबींसंदर्भात राज्य शासनाला शिफारस / अहवाल सादर करण्याचे प्रस्तुत समितीवर बंधन घालण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रधान सचिव, (सेवा) यांचे अध्यक्षतेखालील अभ्यासगटात श्री.सुमंत भांगे, श्रीमती मनिषा कदम, श्रीमती गीता कुलकर्णी, सु.मो.महाजन व टि.वा.करपते इत्यादी सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर समिती स्थापनेसंदर्भातील शासन निर्णय प्रत्यक्षात केव्हा निर्गमित करण्यात आला व त्याबाबत कोणकोणते निकष वा अटी घालण्यात आल्या आहेत तसेच समितीने किती कालावधीत आपला अहवाल / शिफारशी शासनास सादर करण्याबाबत शासन आदेशानुसार कळविण्यात आले आहे,

(५) त्यानुसार आतापर्यंत समितीच्या किती बैठका झाल्या आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उद्धव ठाकरे :** (१) व (२) सामाजिक व समांतर आरक्षण संबंधित निर्णयाचे एकत्रिकरण करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११.०८.२०२१ च्या शासन निर्णयान्वये अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली आहे.

सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार शासन निर्णयात सुधारणा करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत व आरक्षणाबाबतच्या सर्व शासन निर्णयांचे एकत्रिकरण करण्यासाठी सदर अभ्यासगट मार्गदर्शन करेल.

(३) होय.

(४) व (५) अभ्यासगटाच्या स्थापनेबाबत दिनांक ११.०८.२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या सदर शासन निर्णयानुसार अभ्यासगटाची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाच्या कामामुळे बुलढाणा जिल्हयातील रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२) * ३३४६९ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाचे काम सुरु असून या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आणि जिल्हा परिषदेच्या रस्त्यांवरुन जड वाहनांची वाहतूक झाल्याने डोणगांव-राजगड आलेगाव रस्ता, अमडापूर, जानेफळ, लोणीगवळी, घाटबोरी जनूना पारंगरखेड बेलगांव केनगांव रस्ता, जानेफळ लावणा लोणीगवळी रस्ता, अमडापूर लव्हाळा दुसरबीड रस्ता, जनूना, घाटबोरी-पाथर्डी रस्ता, अंजनी, घाटबोरी, टेंभूरखेड रस्ता गोमेधर, रत्नापूर, लावणा, मोळा रस्ता, नायगांव दत्तापूर, शेंदला, मोळा रस्ता जामगांव, शहापूर, उमरा, लोणी गवळी असे एकूण १०० कि.मी.चे रस्ते खराब झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) बुलढाणा जिल्हयातील नागपूर मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग प्रकल्पाच्या कंत्राटदारांनी एकुण ३३ कि.मी. लांबीचे रस्ते हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाच्या गौण खणीज

वाहतुकीसाठी वापरले आहेत. त्यापैकी २७ कि.मी. लांबीचे रस्ते दुरूस्तीचे काम पूर्ण केले असून ६ कि.मी. लांबीच्या रस्त्याची दुरूस्ती प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असलेले रस्ते दुरुस्त करण्याबाबत

**(३) * ३४०१० श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा परिषदेचे २६ रस्ते खराब झाले असून एमएसआरडीसीकडून काही रस्ते निकृष्ट पध्दतीने दुरुस्त केले असल्याचे दिनांक ४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन जिल्हा परिषदेचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतले नसताना रस्ते वापरणाऱ्या एमएसआरडीसीकडून तातडीने दुरुस्ती करुन घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय अंशतः खरे आहे.

अमरावती जिल्हयातील समृद्धी महामार्गाचे काम ई.पी.सी. कंत्राटदार मे.एन.सी.सी. लि. यांचे मार्फत कार्यान्वीत करण्यात येत आहे. समृद्धी महामार्गाचे काम कार्यान्वीत करताना जि.प. अखत्यारितील २६ रस्त्यांचा वापर करण्यात आला नसून एकूण फक्त १२ रस्त्यांचा (एकुण लांबी ८.१५

किमी) वापर कंत्राटदाराकडून साहित्य वाहतुकीसाठी करण्यात आला आहे. या १२ रस्त्यांपैकी १० रस्त्यांची दुरुस्ती कंत्राटदाराकडून करण्यात आल्याचे दि.०२.०९.२०२१ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अमरावती यांना कळविण्यात आले आहे.

(२) उपरोक्त नमूद १२ रस्ते हे सार्वजनिक वाहतूकीसाठी असल्यामुळे सदर रस्त्यांवरुन समृद्धी महामार्गाच्या बांधकाम साहित्य वाहतूकीची स्वतंत्र नाहरकत घेण्याची आवश्यकता नाही.

तथापि, अमरावती जिल्ह्यातील समृद्धी महामार्गास इ.जि.मा. व ग्रा.मा. छेदणाऱ्या ठिकाणी प्रस्तावित रस्ता ओलांडणी पूल (VUP/CUP/ LVUP) बांधकामासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) अमरावती यांनी पत्र क्र.जिप/बांध/प्रआरे/तां/१३८२/२०१९, दि.२०.०२.२०१९ अन्वये नाहरकत प्रदान केली आहे.

समृद्धी महामार्गाच्या बांधकामासाठी ई.पी.सी. कंत्राटदार मे.एन.सी.सी. लि. यांचेकडून बांधकाम साहित्य वाहतूक करतांना जि.प. अखत्यारितील वापर केलेल्या रस्त्यांची वाहतूक सुरळीत राहण्याकरिता कंत्राटदाराकडून वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच सदर वाहतूकीमुळे नादुरुस्त झालेल्या उर्वरीत रस्त्यांची दुरुस्ती संबंधीत कंत्राटदाराकडून करवून घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## खामगाव-जालना येथील रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम पुर्ण करण्याबाबत

**(४) * ३४८८४ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव-जालना चौपदरीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आले असताना सदर ठिकाणच्या रस्त्यांच्या कामावर हरकती घेतल्याने काम प्रलंबित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे अनेक ठिकाणी रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असून छोटे-मोठे अपघात होत आहेत हे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील रस्त्यांचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) वनक्षेत्रातील लांबीत काम करण्याकरिता वन विभागाकडून परवानगी प्राप्त होईपर्यंत काही प्रमाणात अपघात होत होते. तथापी सदर क्षेत्रातील चौपदरीकरणाचे काम करण्यास वन विभागाकडील परवानगी प्राप्त झाल्यानुसार तेथील काम पूर्ण करण्यात येऊन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(३) सदर काम मार्च-२०२२ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडगावशेरी (जि.पुणे) येथील लक्ष्मी नगर व कामराज नगर भागातील भुयारी गटाराचे काम पुर्ण करण्याबाबत

**(५) * ३३८८० श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगावशेरी (जि.पुणे) येथील लक्ष्मीनगर व कामराज नगर भागात बऱ्याच दिवसांपासून भुयारी गटाराच्या समस्या निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑगस्ट, २०२० च्या पावसाळ्यात भुयारी गटाराचे पाणी लोकांच्या घरांत शिरल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महापालिकेच्या कनिष्ठ अभियंता, शाहिद पठाण व विजय देवकाते यांच्या समवेत पाहणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महापालिका अधिकाऱ्यांनी पाहणी करून देखील एक वर्षापासून भुयारी गटारांची अवस्था खूप गंभीर असून, याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर दिसून आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच उक्त भागातील भुयारी गटाराचे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) येरवडा येथील लक्ष्मीनगर व कामराज नगर हा दाट लोकसंख्येचा परिसर असून सदर परिसरात सकाळी पाण्याचा वापर विविध कारणांकरीता मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे ड्रेनेजची वहन क्षमता अपुरी पडते. या कारणामुळे सदर कालावधीत ड्रेनेज लाईन ओव्हरफ्लो होते, हे खरे आहे.
(२) व (३) स्थानिक मा.विधानसभा सदस्य तसेच पुणे महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांनी दि. ०२/१२/२०२० रोजी लक्ष्मीनगर परिसरात पहाणी केली होती, हे खरे आहे.

नागरीकांच्या बाबतीत अनारोग्य परिस्थिती नाही, असे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(४) पाहणीमध्ये झालेल्या चर्चेस अनुसरुन पुणे महानगरपालिकेमार्फत जागेवरील चेंबर्स व मलनि:सारण नलिकेची साफसफाई करण्यात आलेली आहे.

मलनि:सारण नलिकेचा व्यास १२ इंच व्यासाचा असून या नलिका बदलून सदर ठिकाणी मोठ्या व्यासाची नलिका बसविणे आवश्यक आहे.

सदरचे काम करण्यात येत असल्याचे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निवळी (ता.जिंतूर, जि.परभणी) येथे वन विभागाने ४५ हेक्टरवर ७२ हजार झाडांची लागवड केल्याचे दाखवून गैरव्यवहार केल्याबाबत

**(६) * ३३३६८ श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निवळी (ता.जिंतूर, जि.परभणी) येथे वन विभागाने ४५ हेक्टरवर ७२ हजार झाडांची लागवड केल्याचे दाखवून ३६ लाख ७२ हजारांचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय वन अधिकारी कार्यालयामार्फत माहे एप्रिल, २०१९ ते ऑगस्ट, २०२० च्या दरम्यान वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी गावात येऊन ७२ झाडांची लागवड करण्याकरता खड्डे खणले परंतु या खड्ड्यात झाडांची लागवड करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) हे खरे नाही. मौजे निवळी ता.जिंतूर, जि. परभणी येथे सन २०१९ च्या पावसाळ्यात वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम योजनेंतर्गत ३३ कोटी वृक्ष लागवड मोहिम राबविणेसाठी एकूण ४५.०० हेक्टर क्षेत्रावर रोपे लागवड करण्यात आली होती. त्यापैकी २० हे. क्षेत्रावर १६ हजार ट्रेंचेस खोदण्यात येवून तेथे ३२ हजार रोपांची लागवड करण्यात आली. तसेच २५ हे. क्षेत्रावर २० हजार ट्रेंचेस खोदून तेथे ४० हजार रोपांची लागवड करण्यात आली होती. अशी एकूण ७२ हजार रोपे लागवड केली आहेत, मात्र त्यामध्ये ३६ लाख ७२ हजार रकमेचा अपहार झाला आहे हे खरे नाही.

महाफॉरेस्टच्या Forest GIS Portal वर मे, २०२० मध्ये उपरोक्त २० हे. व २५ हे. क्षेत्रावर जिवंत रोपांची टक्केवारी अनुक्रमे ७९% व ८२% दर्शविली आहे. ऑक्टोबर २०२० मध्ये जिवंत रोपांची टक्केवारी अनुक्रमे

८१% व ८७% आणि मे, २०२१ मध्ये अनुक्रमे ७५% व ७६% दर्शविली आहे. तथापि, एप्रिल, २०२१ रोजी रोपवन जळाल्याने Forest GIS Portal वर ऑक्टोबर, २०२१ रोजी जिंवत रोपांची टक्केवारी अनुक्रमे २२% व २१% इतकी दर्शविली आहे. मात्र श्री. रामेश्वर खिस्ते रा. मौजे निवळी यांनी दि. १२.०३.२०२१ रोजी जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे अशा प्रकारची तक्रार केलेली आहे.

(२) हे खरे नाही. परभणी वन विभागाने सन २०१९ च्या पावसाळयात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेवून, मौजे निवळी, ता. जिंतूर, जि. परभणी येथे ३६००० ट्रेन्च खोदून त्यावर ७२००० रोपांची लागवड केलेली आहे.

(३) श्री.रामेश्वर खिस्ते, रा.निवळी यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे दि.१२.०३.२०२१ रोजी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने उपजिल्हाधिकारी (रोहयो), परभणी यांच्या दि.१५.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, निवळी, ता.जिंतूर, जि. परभणी येथे वृक्ष लागवडीकरिता रोपवनाचा खर्च हा मग्रारोहयो योजनेंतर्गत झालेला नसून तो भरगच्च वनीकरण कार्यक्रमांतर्गत झालेला असल्याने, सदर प्रकरणाचे त्रयस्थ शासकीय यंत्रणेमार्फत चौकशी करुन शासन नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक), परभणी यांना कळविले आहे. त्यानूसार वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांच्या पत्र क्र. ३५७३, दिनांक २०/१२/२०२१ अन्वये, सदर प्रकरणाची चौकशी करणेकरीता विभागीय वन अधिकारी (नियोजन), औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करण्यात आली आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.४१ व ४२ मधील रस्त्यांच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(७) * ३३५१५ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.४१ व ४२ मधील रस्त्यांच्या कामांमध्ये प्रचंड प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत रस्त्यांच्या कामाच्या फोटोसह तेथील स्थानिक युवक श्री.महेश भोसले यांनी मा.नगरविकास मंत्री व जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक ३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बदलापूर नगरपरिषद हद्दीतील वार्ड क्र.४१ व ४२ मधील निकृष्ठ दर्जाची कामे करून प्रचंड प्रमाणात गैरव्यवहार करणाऱ्या ठेकेदार व निकृष्ठ दर्जाच्या कामाची देयके अदा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे** : (१) अशा आशयाचे निवेदन कुळगांव बदलापूर नगरपरिषदेस प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

(२) व (३) पावसामुळे संबंधित रस्त्याची दुरावस्था झाली होती. सदरचा रस्ता दुरुस्त करण्याची स्थानिक नागरीकांची मागणी विचारात घेता नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार प्राप्त प्रशासकीय व वित्तीय मान्यतेनुसारच सदर ठिकाणी डांबरीकरणाचे काम पूर्ण केले असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

तसेच, सदर कामाची "त्रयस्थ यंत्रणेमार्फत" तपासणी करण्यात आली असून कामाचा दर्जा प्रथमदर्शनी योग्य असल्याचे तसेच, कामाचे अंतिम बिल अद्याप अदा केले नसल्याचे नगरपरिषदेच्या अहवालात नमूद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झोपडपट्टीच्या पहिल्या मजल्यावरील झोपडपट्टीधारकांना मोफत घरे देणेबाबत

**(८) * ३२४९५ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत फक्त भुखंडावर असलेली झोपडी गृहीत धरुन ०१ जानेवारी, २००० पर्यंत मोफत व त्यानंतर ०१ जानेवारी, २०११ पर्यंतच्या झोपडपट्टीधारकाला स:शुल्क घर देण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने घेताना झोपडपट्टीच्या पोट वा पहिल्या मजल्यावर राहणा-या झोपडपट्टीधारकांनाही पर्यायी घर देण्याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय मागविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विधी व न्याय विभागाने झोपडपट्टीमधील पोटमाळा व पहिल्या मजल्यावर राहणारे झोपडपट्टीधारक हे झोपडी कायद्यातील २०१७ च्या सुधारित अधिसुचनेनुसार 'फ' कलमानुसार असंरक्षित धारक असून ते पर्यायी घरांसाठी पात्र ठरतात असा अभिप्राय दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात निवडणूक आचारसंहिता लागू झाल्याने प्रलंबित राहिलेल्या निर्णयास शासनाने मंजूरी देण्यास नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) दिनांक ११/०१/२०११ रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या परंतु शासन निर्णय दि.१६/०५/२०१५ नुसार संरक्षणपात्र ठरत नसलेल्या झोपडपट्टी क्षेत्रातील झोपड्यांच्या संदर्भात अशा झोपडीतील प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीधारकांचे स:शुल्क पुनर्वसन करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले असून त्याबाबतची कार्यपध्दती शासन निर्णय दि.१६/०५/२०१८ अन्वये विहित केली आहे.

दरम्यानच्या काळात स्थानिक लोकप्रतिनिधींनी झोपडीच्या पहिल्या मजल्यावरील झोपडीधारकांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत समाविष्ट करण्याची मागणी शासनाकडे केली होती. त्यानुषंगाने विधि व न्याय विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

तथापि, महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ मध्ये संरक्षित झोपडीधारकांची व्याख्या केलेली असली तरी असंरक्षित झोपडीधारकांची व्याख्या उक्त अधिनियम अथवा सुधारणा अधिनियम, २०१७ मध्ये करण्यात आलेली नाही. संरक्षित झोपडीधारकांची व्याख्या पाहता झोपडीच्या पहिल्या मजल्यावरील झोपडीधारक असंरक्षित झोपडीधारकांच्या श्रेणीत येऊ शकतात तसेच या कारणास्तव ते महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) (सुधारणा) अधिनियम, २०१७ अन्वये करण्यात आलेल्या सुधारणेनुसार अधिनियमाच्या कलम ३ (ब)(५)(फ) मधील तरतुदीनुसार देय असलेले लाभ घेण्यास पात्र ठरु शकतील असे अभिप्राय विधि व न्याय विभागाने दिलेले आहेत.

(३) झोपडपट्टी पुनर्वसनाबाबतच्या शासनाच्या मूळ धोरणानुसार झोपडीच्या पहिल्या मजल्यावरील झोपडीधारक झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पुनर्वसनास पात्र ठरत नाहीत. सदरची वस्तुस्थिती स्थानिक लोकप्रतिनिधींना अवगत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील चेंबूरच्या वाशीनाका परिसरातील डोंगरावरील झोपडपट्टीवर भाभा अणुसंशोधन केंद्राची (बीएआरसी) संरक्षक भिंत कोसळल्याबाबत

**(९) * ३४१५१ श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात दिनांक १७ जुलै, २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे चेंबूरच्या वाशीनाका परिसरातील डोंगरावर वसलेल्या न्यू भारत नगर या

झोपडपट्टीवर भाभा अणुसंशोधन केंद्राची (बीएआरसी) संरक्षक भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेत १९ नागरिकांचा मृत्यू झाला व इतर ७ जण जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच दुर्घटनेत मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना तसेच जखमींना शासनाने कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) भविष्यामध्ये अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत:-

भविष्यामध्ये दरड कोसळण्याची दुर्घटना घडून जीवितहानी व वित्तहानी होणाऱ्या अतिप्रभावित संभाव्य ठिकाणांच्या एकूण २२८ रहिवाशांना एस.जी. केमिकल्स येथील ४२ खोल्यांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरीत करण्यात आले आहे व ३८ रहिवाशांना महानगरपालिकेच्या मारवली महानगरपालिका आर.सी.मार्ग शाळेमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहे.

उर्वरित दरडी कोसळण्याच्या शक्यता असलेल्या संभाव्य ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या रहिवाशांचे स्थलांतरण करणेबाबत जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगरे) यांना महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

उप अभियंता-५ (पूर्व), मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (म्हाडा), मुंबई यांना संभाव्य दरडी कोसळणाऱ्या ठिकाणी संरक्षण भिंत बांधणेकरीता एकूण १६९ ठिकाणी ना-हरकत देण्यात आली आहे.

आपत्ती व्यवस्थापन अभिनियम, २००५ अन्वये अतिरिक्त आयुक्त (पू.उप.) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करुन बैठकीमध्ये शहर व उपनगरांचे जिल्हाधिकारी यांना सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत भारतीय भौगोलिक सर्वेक्षण विभागाने सप्टेंबर, २०१८ मध्ये सुचविलेल्या व इतर

आवश्यक उपाययोजना करणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(४) न्यू भारतनगर, वाशीनाका, चेंबूर येथील दुर्घटनेत मृत झालेल्या व्यक्तीच्या वारसांना शासनामार्फत रु.५,००,०००/- व जखमींना रु. ५०,०००/- इतकी मदत करण्यात आली आहे.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभागामार्फत स्थलांतरीत केलेल्या एकूण २६६ रहिवाशांना एचपीसीएल व सेवाभावी संस्था यांच्यामार्फत दिनांक ३०.०९.२०२१ पर्यंत खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

दुर्घटनाग्रस्त ठिकाणचा मलबा व इतर कचरा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभागामार्फत उचलण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पदभरतीसाठीच्या परीक्षेची जाहिरात दोन वर्षानंतर प्रसिद्ध करण्यात आल्याबाबत

**(१०) * ३५१०७ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पदभरतीसाठी परीक्षेची जाहिरात तब्बल माहे ऑक्टोबर, २०२१ दरम्यान दोन वर्षानंतर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात परीक्षा न झाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी वयोमर्यादा ओलांडली असून त्यांना वयोमर्यादा वाढवून मिळावी म्हणून मोठ्या प्रमाणावर मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वयोमर्यादा वाढवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त निर्णय किती दिवसात घेण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) याबाबत साधक-बाधक विचार करुन निर्णय घेण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव-दे.साकर्शा राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी पालखी मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याबाबत

**(११) * ३५६७३ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव-दे-साकर्शा राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी या पालखी मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधित मा.मंत्री महोदय व वरिष्ठ अधिकारी यांचेकडे पुराव्यानिशी तक्रारी केल्या आहेत हे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे टेंभूर्णा गावाला जोडणारा पोचरस्ता व पूलाचे काम अपूर्णावस्थेत असून इतरही गावांमधील नागरिकांना त्यांच्या शेतात जाण्यास अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता (रा.म.) म.रा.र.वि.मं.मर्या. बुलढाणा शिबीर कार्यालय मेहकर यांचेसोबत माहे जुलै, २०२० मध्ये वा त्या दरम्यान सदरहू मार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून या कामातील त्रुटी निदर्शनास आणून दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू पाहणीनंतर कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे पत्र क्रमांक ईई/म.रा.र.वि.मं मेहकर/२६२/२०२० दिनांक २४ जुलै, २०२० अन्वये श्री स्वामी समर्थ इंजिनिअर्स अँड आयसीओ प्रोजेक्ट (जे.व्ही.) पुणे यांना दोषपूर्ण कामे २ महिन्यात पूर्ण करण्याबाबत कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, त्यानुषंगाने सदरहू कामे पूर्ण करण्यात आली आहेत काय, असल्यास त्या कामांची कार्यकारी अभियंता (रा.म.) म.रा.र.वि.मं.मर्या. बुलढाणा शिबीर कार्यालय मेहकर यांनी केव्हा पाहणी केली असून त्यांच्या निदर्शनास कोणत्या बाबी आल्या आहेत, तसेच कामे निकृष्ट दर्जाची आढळून आल्यास संबंधित कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) हे खरे नाही. मौजे टेंभुर्णी गावाला जोडणाऱ्या रस्ता व पुलाचे काम पुर्ण झालेले आहे व इतर गावांमधील नागरिकांना शेतात जाण्यासाठीचे रस्ते सुस्थितीत आणण्यात आले आहेत.

(४) होय, हे खरे आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) कामातील त्रुटी दुर करण्यात आल्या आहेत व कामावर नियुक्त केले प्राधिकृत अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २८.०८.२०२१ रोजी स्थळ पाहणी केली आहे. त्यात काम मानकाप्रमाणे झालेले आढळले. त्यामध्ये काम निकृष्ट झाले असल्याचे दिसून आले नाही.

-----------------

## मुंबईतील म्हाडाच्या पुनर्विकसीत इमारतीमध्ये संबंधित म्हाडा अधिकारी आणि दलाल यांच्या संगनमताने झालेला गैरव्यवहार

**(१२) * ३२४५८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर, परळ, लालबाग, गिरगांव आदि मोक्याच्या ठिकाणी म्हाडाने पुनर्विकसीत केलेल्या इमारतीतील सदनिका म्हाडाचे संबंधित अधिकारी आणि दलाल प्रति सदनिकेपोटी ४० ते ५० लाख रुपये अतिरिक्त घेऊन गैरव्यवहार करीत असल्याप्रकरणी प्राप्त तक्रारीनुसार मा.गृहनिर्माण मंत्री महोदयांनी सदनिका विक्रिवरील लागू केलेली स्थगिती अखेर दिनांक १५ सप्टेंबर, २०२१ रोजी शासनातर्फे उठविण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी प्राप्त तक्रारीवर शासनाकडून करण्यात आलेल्या चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार किती पुनर्विकसीत इमारतीमध्ये सदनिकांची अतिरिक्त पैसे घेऊन विक्री झाल्याचे निष्पन्न झाले आहे व यामध्ये किती दोषी अधिकारी व दलाल यांचेविरुद्ध शासनाने कारवाई करुन सदनिका जप्त केल्या आहेत,

(३) तसेच, सदरहू सदनिका विक्रीवरील स्थगिती उठविण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१), (२) व (३) मुंबई इमारत व दुरूस्ती मंडळामार्फत बृहतसुचीवरून गाळे वितरीत करताना सुसुत्रता आणण्याच्या दृष्टिकोनातून कार्यपध्दती ठरविण्यासाठी दिनांक ०२.०७.२०२१ रोजी स्थगिती देण्यात आली होती. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी बृहतसुचीवरील गाळे पारदर्शकपणे वितरण करण्याबाबत दि.२७.०७.२०२१ रोजी परिपत्रक निर्गमित केल्यानंतर दि.०९.०९.२०२१ रोजी स्थगिती उठविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर पालिकेतील मेसर्स हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीचे कंत्राट रद्द करुन दंडात्मक कारवाई करण्याबाबत

**(१३) * ३२८३६ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या ९ रुग्णालयांमध्ये १६ प्राणवायू निर्मिती प्रकल्प उभारण्याचे काम करण्याकरीता मेसर्स हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीला ८४ कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अटी व शर्तीनुसार दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्यामुळे या कंपनीवर नोटीस बजावून पालिका प्रशासनाने दंडात्मक कारवाईचा इशारा दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मात्र पालिकेने या मेसर्स हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीला पुनश्च ११ जम्बो कोरोना उपचार केंद्रांत प्राणवायू निर्मिती प्रकल्प सुरु करण्यासाठी तब्बल ६७ कोटी रुपयांचे कंत्राट दिले असल्याची बाब दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने मेसर्स हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीचे कंत्राट रद्द करण्यासाठी तसेच अटी व शर्तीच्या अनुषंगाने दिलेल्या मुदतीत विहित काम पुर्ण न केल्यामुळे दंडात्मक कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ९ रुग्णालयांमध्ये १६ प्राणवायू निर्मिती प्रकल्प उभारण्याचे काम मेसर्स हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीला रु. ८३.८३ कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आले होते. सदर कंत्राटामध्ये प्राणवायू निर्मिती संचाचे एक वर्षाकरिता प्रचालन व पाच वर्षाकरिता सर्वसमावेशक सेवा व परिरक्षणाचे काम अंतर्भूत आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सदर कंपनीने कंत्राटातील अटी व शर्तीनुसार दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्यामुळे सदर कंपनीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेने नोटीस बजावली होती हे खरे आहे.

(३) कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेमध्ये मोठया प्रमाणात प्राणवायुची आवश्यकता भासल्यामुळे मुंबईतील जम्बो कोरोना केंद्रामध्ये दुसऱ्या टप्प्यात ऑक्सिजन निर्मिती संयंत्रणे प्रस्थापित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त निविदेस अनुसरुन मे.हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीला ४ जम्बो कोरोना उपचार केंद्रांमध्ये प्राणवायु निर्मिती प्रकल्प सुरु करण्यासाठी रु.६६.८४ कोटी एवढ्या किंमतीचे कंत्राट देण्यात

आले. सदर कंत्राटामध्ये प्राणवायु निर्मिती संचाचे तीन वर्षांकरिता प्रचालन व तीन वर्षांकरिता सर्वसमावेशक सेवा व परिरक्षणाची कामे अंतर्भूत आहेत.

तथापि सद्य:स्थितीतील आवश्यकतेनुसार तीन जम्बो कोरोना उपचार केंद्रांमध्ये प्राणवायु निर्मिती संचाचे कार्यादेश देऊन उभारणीचे काम मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीमार्फत पूर्ण करण्यात आले आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर प्रकरणी चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि उशिरा काम पूर्ण केल्याबद्दल मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीला निविदेच्या अटी व शर्तीनुसार रु.३.०६ कोटी इतका दंड आकारण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वन विभागात स्थापत्य विभागाशी निगडीत असणारी कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्याबाबत

**(१४) * ३२७९६ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वनविभागामार्फत वनसंरक्षण, वनसंवर्धन व वृक्षलागवड करण्यासाठी दरवर्षी कोट्यावधी रुपये शासन खर्च करत असते, परंतू स्थापत्य विभागाशी निगडीत असणारी कामे करण्यासाठी कोणतीही सक्षम यंत्रणा वन विभागाकडे नसल्याने सदरची सर्व कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राबविण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, वने विभाग यांचेकडे दिनांक २ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जंगलांचे संवर्धन करणाऱ्या वनविभागाकडे स्थापत्य विभागाची कामे करण्याबाबत कोणतीही स्वतंत्र यंत्रणा नसल्याने सदरील कामांची अंदाजपत्रके तयार करताना बाह्ययंत्रणा किंवा खाजगी व्यक्ती यांचेमार्फत प्रस्ताव तयार करावा लागतो याकरीता शासनाच्या अधिनस्त विभाग असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सर्व कामे केल्यास गुणवत्ता

देखील टिकून राहू शकते याकरीता दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे काय,

(३) असल्यास, त्याची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) वन विभागामध्ये सन १९५९ पासून अभियांत्रिकी शाखा अस्तित्वात आहे. सदर शाखेमध्ये एक वन अभियंता १३ उपवनअभियंते आणि ३० सहाय्यक / शाखा / कनिष्ठ अभियंत्याची पदे आहेत. वन विभागातील सर्व स्थापत्य बांधकामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्याबाबत आमदार मा.प्रकाश आनंदराव आबिटकर, विधानसभा सदस्य यांनी दि.२.६.२०२१ च्या पत्रान्वये मागणी केली आहे.

(२) व (३) वन विभागात करावयाच्या स्थापत्य कामांची अंदाजपत्रके वन विभागात कार्यरत असलेल्या अभियंत्याकडूनच तयार केली जातात व त्यांची मान्यता विहित कार्यप्रणाली व मर्यादेनुसार सक्षम अधिकाऱ्यांद्वारे प्रदान केली जाते. क्षेत्रिय अधिकारी आणि कर्मचारी हे सुध्दा स्थापत्य अभियंत्रिकीमध्ये प्रशिक्षित असल्यामुळे व वन विभागातील अभियंत्यांचे सहाय्य असल्यामुळे बांधकामाची गुणवत्ता राखली जाते.

वन विभागात करावयाची काही स्थापत्य बांधकामे स्थानिक परिस्थितीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ठेवकाम (Deposit Work) म्हणून देऊन पूर्ण करून घेतली जातात. तथापि त्यांच्याकडून सुध्दा ब-याच वेळी विहित कालावधीत कामे करण्यात येत नाही व पर्यायाने बांधकाम खर्चात वाढ होते व त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग जादा अनुदानाची मागणी करतात. सदर जादा रकमेचा भार वन विभागास सोसावा लागतो. त्यामुळे मा.लोकप्रतिनिधी यांनी मागणी केल्यानुसार वन विभागातील सर्व स्थापत्य कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करणे संयुक्तिक ठरणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील सिडको हद्दीतील गृहप्रकल्प तसेच नव्याने निर्माण होणाऱ्या गृहप्रकल्पांना पाणी पुरवठा होण्याबाबत

**(१५) * ३२४४७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील सिडको व नैना अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत तसेच सर्वसामान्यांना परवडणाऱ्या मोठया प्रमाणावर राबविण्यात येत असणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पाला तातडीने मुलभुत सुविधा, नियमित व मुबलक पाणीपुरवठा करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको लि., नवी मुंबई यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको विकसीत खारघर, कामोठे, कळंबोली, नविन पनवेल येथील काही विभागांत अत्यंत अनियमित पाणी पुरवठा होत असून नागरिकांना दरवर्षी तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असून सिडकोच्या नियोजन शुन्य कारभारामुळे नव्याने विकसित होणाऱ्या गृह प्रकल्पामुळे भविष्यात गंभीर पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विशेषत: सिडकोने विकसित केलेल्या कामोठे येथील वाढती लोकसंख्या पहाता पिण्याच्या पाण्याची क्षमता ४२ एमएलडी इतकी असून मागील दोन महिन्यापासून २० ते २५ एमएलडी इतकाच पाणी पुरवठा होत असल्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी सिडकोमार्फत नव्याने विकसित होणाऱ्या मोठ्या प्रमाणातील गृहप्रकल्पांना पाणी पुरवठयाचे वेळीस उपाययोजना न झाल्यास भविष्यात नागरिकांच्या असंतोषाचा उद्रेक होण्याची शक्यता निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सिडको हद्दीतील गृहप्रकल्प, नव्याने निर्माण होणाऱ्या गृह प्रकल्पांना तसेच कामोठे येथील वसाहतींना पाणी पुरवठा होण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) सिडकोमार्फ़त संबंधित विभागांना / नोडस ला पाणी पुरवठा करण्यासाठी एम.आय.डी.सी.चे बारवी, पाताळगंगा स्त्रोत, महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या मोरबे प्रकल्प तसेच न्हावा शेवा टप्पा-१ अंतर्गत भाग भांडवल देऊन वेळोवेळी पाण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

नव्याने विकसित होणा-या गृहप्रकल्पांसाठी व नैना अंतर्गत राबविण्यात येणा-या वसाहतीसाठी सन-२०५० पर्यंत लागणा-या पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने हेटवणे पाणी पुरवठा योजना (२७० द.श.लि.), बाळगंगा बाळगंगा पाणी पुरवठा योजना (३५० द.श.लि.), कोंढाणे पाणी पुरवठा योजना (२५० द.श.लि.), मोरबे पाणी पुरवठा योजना (२५० द.श.लि.), व महाराष्ट्र जिवन प्राधिकरण न्हावा शेवा टप्पा १ ते ३ योजनेमधुन (१५४ द.श.लि.) असा एकूण १११४ द.श.लि. पाणी पुरवठ्याचे नियोजन आहे. भविष्यात गृहनिर्माण प्रकल्पामधुन निर्माण होणा-या सांडपाण्याच्या प्रक्रियेचा व पाणी पुनर्वापर प्रक्रियेचा समावेश नियोजनामध्ये केलेला आहे.

पाणी पुरवठा नियमित व योग्य दाबाने करण्यासाठी टाटा कन्स्लटिंग इंजिनियर्स (TCE) ची नियुक्ती केली असुन त्यांच्या सुचनेनुसार पाणी पुरवठा समतोल करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड नगरपालिकेने प्रधान मंत्री आवास योजनेतील घरकुल वाटपात केलेला गैरव्यवहार

**(१६) * ३५१७५ श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल योजना राबविताना बीड नगर पालिकेने मोठ्या प्रमाणावर अनियमितता व गैरव्यवहार केल्यामुळे शहरातील पात्र लाभार्थी योजनेच्या रास्त लाभापासून वंचित राहिले असून प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी शहरातील नागरिकांनी व पदाधिकाऱ्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, योजनेतील घरकुल बांधकामासाठी डी.पी.आर. क्र.१ व २ नुसार सुमारे सात कोटीहून अधिकचा निधी बीड नगर परिषदेकडे जमा असताना पालिकेने सुमारे वर्षभराचा कालावधी पूर्ण होऊनही लाभार्थ्यांना अद्याप नियमाप्रमाणे बांधकामाचा दुसरा हप्ता वाटप केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, योजनेतील पात्र लाभार्थी अतिशय गरीब असून त्यांना घरे नाहीत. अशा परिस्थितीत त्यांनी बांधकाम केलेल्या घरकुलाचे पैसे पालिकेने अदा करण्यास अक्षम्य विलंब केल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, योजनेचा लाभ देताना राबविण्यात आलेली बेकायदेशीर प्रणाली, पैसे घेऊन निवडलेले लाभार्थी आणि लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करण्यास झालेली अनियमितता याची चौकशी करून दोषीविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच शहरातील पात्र लाभार्थ्यांना योजनेचा रास्त लाभ मिळावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.जितेंद्र आव्हाड :** (१) सदर प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी प्राप्त झाली नसल्याचे बीड नगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

बीड नगरपालिकेने प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत मंजूर डी.पी.आर क्र. १ व २ साठी प्राप्त निधीतून नियमानुसार पहिल्या व दुसरा हप्त्याचे वाटप केले आहे. बीड नगरपालिकेस मंजूर करण्यात आलेल्या निधीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

**(रुपये कोटी)**

| मंजूर घरकुले | केंद्र हिस्सा | | राज्य हिस्सा | |
|---|---|---|---|---|
| | अनुज्ञेय निधी | मंजूर निधी | अनुज्ञेय निधी | मंजूर निधी |
| DPR क्र.१ १०९ घरकुले | १.६३५ | ०.६४२ | १.०९० | १.०९० |
| DPR क्र.२ ९१० घरकुले | १३.६५० | ५.४४८ | ९.१०० | ७.६५० |
| **एकूण** | **१५.२८५** | **६.०९** | **१०.१९** | **८.७४** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे बीड नगरपालिकेस केंद्र हिश्श्याचा रुपये ६.०९ कोटी मंजूर करण्यात आले असून, राज्य हिश्श्याचा पात्र लाभार्थ्यांना संपूर्ण निधी मंजूर करण्यात आला आहे.

(३), (४) व (५) सदर योजनेंतर्गत बीड नगरपालिका क्षेत्रात लाभार्थी निवड नियमानुसार करण्यात आली असून, पात्र लाभार्थ्यांना निधी वितरण शासनाच्या कार्यपद्धती व नियमानुसार करण्यात आले आहे, असे अभियान संचालक, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) यांनी कळविले आहे.

-----------------

## अकोला शहरातून वाहणाऱ्या मोर्णा व विद्रुपा नदींच्या पूर नियंत्रण रेषेअंतर्गत बेकायदेशीर ले-आऊट व बांधकामांना परवानगी दिल्याबाबत

**(१७) * ३४०२८ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातून वाहणाऱ्या मोर्णा व विद्रुपा नदींच्या पूर नियंत्रण रेषेअंतर्गत बेकायदेशीर ले-आउट व बांधकामांना परवानगी देण्यात आल्याची बाब दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, अकोला यांनी सदर प्रकरणी त्यांचे कक्षात महसूल अधिकारी व बांधकाम व्यवसायिकांची सुनावणी घेतली

असता, पूरनियंत्रण रेषेखाली बेकायदेशीर ठरविण्यात आलेल्या परवानग्या देण्याकरिता तत्कालीन उप विभागीय अधिकारी व निवासी उप जिल्हाधिकारी हेच जबाबदार असल्याचे, बांधकाम व्यवसायिकांनी स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुनावणी प्रकरणी सविस्तर व वस्तुनिष्ठ माहिती जाणून घेण्याकरिता जिल्हाधिकारी यांनी सदर प्रकरणी दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ रोजी पुनश्च सुनावणी घेतली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सुनावणी दरम्यान जिल्हाधिकारी यांनी बेकायदेशीर परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील बांधकामासंबंधी विकास परवानगीबाबत 'स्थानिक प्राधिकरण' अकोला महानगरपालिका आहे.

शहराअंतर्गत लाल व निळी पूररेषा निश्चित झालेली आहे. नव्याने महानगरपालिकेस समाविष्ट २४ महसूली गावाचे अद्याप लाल व निळी पूररेषा निश्चित झालेली नाही.

सन २००२ मध्ये अकोला शहराचा विकास आराखडा तयार झाला असून सन २००६ मध्ये पाटबंधारे विभागाने लाल व निळी पुररेषा निश्चित केली आहे. त्यापुर्वी अकृषिक वापराबाबत आदेश निर्गमित करताना पाटबंधारे विभागाचे नाहरकत घेऊन केल्याचे दिसून आले.

सदर पुररेषा निश्चित करतांना नकाशावर प्रमाणबध्द पुररेषा (लाल व निळी) रेष दर्शविण्यास अडचण निर्माण झाल्यामुळे त्यानंतर नव्याने सर्वेक्षण करून लाल व निळी पुररेषा निश्चित करण्याबाबत पाटबंधारे विभाग अकोला यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच निश्चित केलेल्या पुररेषेमध्ये नागरीकांचे व्यवहार थांबू नये म्हणून खरेदी विक्री व्यवहार करताना अकोला पाटबंधारे विभागाचे नाहरकत घेऊनच खरेदी नोंदविण्याबाबत आदेश पारित करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) पुरामुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व बांधकाम व्यवसायीकांची जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडे सुनावणी घेण्यात आली. सुनावणी दरम्यान बांधकाम व्यावसायीकांकडून त्यांच्या अभिन्यासास / बांधकामास दिनांक २१ व २२ जुलै, २०२१ रोजीच्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या महापूराचे पुर्वी संबंधीत सक्षम अधिकारी यांचे कडून तत्कालीन मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार तसेच पुर्वीच्या पुर नियंत्रण रेषेच्या उपलब्धतेनुसार ज्या ठिकाणी पुररेषा उपलब्ध नाही त्या ठिकाणी पाटबंधारे विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र विचारात घेवून मंजुरी प्राप्त असल्याचे बांधकाम व्यावसयिकांनी त्यांचे वतीने स्पष्ट केले आहे. त्यामुळे या बाबत अभिन्यास / बांधकाम परवानगी ही सक्षम प्राधिकरणाचे शिफारशीनुसार मंजूर करण्यात आली असल्याचे दिसून येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काळबादेवी (मुंबई) येथील भागात इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेबाबत

**(१८) * ३३१११ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील काळबादेवीतील दादी सेठ अग्यारी लेन येथील खांडरावववाडीतील म्हाडाची इमारत क्र.५ ही चार मजली इमारत दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका रहिवाशाचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारत कोसळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर इमारत धोकादायक घोषित करण्यात आली होती काय,

(४) असल्यास, धोकादायक घोषित केली असल्यास इमारत वेळीच रिक्त करण्यात का आली नाही व त्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर इमारत “अ” वर्ग उपकर प्राप्त असून सन १९४० पुर्वीची असल्यामुळे नैसर्गिकरित्या कोसळली.

(३) नाही.

(४) बाब क्र.३ पाहता प्रश्न उद्भवत नाही.

(५) सदरहु बाबीच्या अनुषंगाने आवश्यक प्रस्ताव महसूल विभागास सादर करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यात गेल्या ६ महिन्यात २२ वाघांचे झालेले मृत्यु

**(१९) * ३३४०५ श्री.अशोक पवार (शिरुर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात “क्ला” (कन्झर्वेशन लेन्सेस अँड वाईल्डलाइफ) ही संस्था गेल्या अनेक वर्षापासून वन्यजीव क्षेत्रात कार्यरत असून या संस्थेकडून वाघांच्या मृत्युसंदर्भात माहिती संकलित करुन ती वेळोवेळी प्रसिध्द केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेने देशपातळीवरील वाघांच्या मृत्यु संदर्भात प्रसिध्द केलेल्या आकडेवारीनुसार, वन कर्मचाऱ्यांच्या कोरोना काळात व्याघ्र संरक्षणावर झालेल्या दुर्लक्ष / परिणामामुळे गेल्या सहा महिन्यात राज्यात २२ वाघांचे मृत्यु झाले असल्याचे दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून देशभरात मागील ६ महिन्यात ८६ वाघांचे मृत्यु झाले असल्याचे दिनांक १४ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, २२ वाघांचे मृत्यु होण्याची नेमकी कारणे काय आहेत, याबाबत शासन स्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार व्याघ्र संरक्षणाच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) “क्ला” (कन्झर्वेशन लेन्सेस अँड वाईल्डलाइफ) या वन्यजीव क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थेने वाघांच्या मृत्युच्या संदर्भात तयार केलेला स्वंतत्र अहवाल शासनास उपलब्ध करुन दिल्याचे आढळून आलेले नाही. तथापि, महाराष्ट्र राज्यातील वाघांच्या मृत्युबाबतची अधिकृत नोंद मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयामार्फत ठेवण्यात येते.

(२) माहे जानेवारी, २०२१ ते जुलै, २०२१ या कालावधीत राज्यात विविध कारणांमुळे एकूण २३ वाघांचा मृत्यु झाल्याची नोंद आहे.

माहे जानेवारी, २०२१ ते जुलै, २०२१ या कालावधीत देशात एकूण ८६ वाघांचा मृत्यु झाला असल्याचे राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या (NTCA) संकेतस्थळावर दर्शविण्यात आले आहे.

(३) राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) यांनी दिनांक १७.१२.२०१२ रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनान्वये व प्रचलित नियमातील तरतूदीनुसार चौकशी अधिकारी यांचेकडुन कार्यवाही करण्यात येते. तसेच तस्करी अथवा शिकारीच्या प्रत्येक प्रकरणामध्ये चौकशी करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ करण्यात येते.

माहे जानेवारी, २०२१ ते माहे जुलै, २०२१ याकालावधीत नैसर्गिक कारणामुळे-१५, रेल्वे अपघातात-१, विषप्रयोगामुळे-४, विद्यृतप्रवाहामुळे-१ व शिकारीमुळे-२ असे एकूण २३ (वयस्क-१५ व बछडे-८) वाघांचा मृत्यु झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहे.

(४) माहे जानेवारी, २०२१ ते माहे जुलै, २०२१ या कालावधीत विषप्रयोगामुळे-४, विद्युतप्रवाहामुळे-१, शिकारीमुळे-२ वाघांचा मृत्यु झाल्याच्या घटनामध्ये खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

- दिनांक ०१.०१.२०२१ रोजी उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यात प्रौढ वाघ-१ व बछडे-३ असे एकूण ४ वाघ विषबाधेने मृत झाल्याचे निदर्शनास आले आहे. प्रस्तुत प्रकरणाच्या चौकशीदरम्यान कालवडीच्या मालकाने विषप्रयोग करुन वाघाला मारल्याचे तपासात कबुल केले आहे. प्रस्तुत प्रकरण प्रथम श्रेणी न्यायदंडधिकारी यांचे न्यायालयात न्यायप्रविष्ठ करण्यात आले आहे.

- एफ.डी.सी.एम. वन प्रकल्प विभागातील रिसाळा सिरोजो उपवनक्षेत्र, वारपाणी बिट येथे दिनांक २३.०३.२०२१ एक वाघ मृत झाल्याची घटना निदर्शनास आली असून सदर प्रकरणी वनगुनहा नोंदविण्यात येऊन पुढील चौकशी सुरु आहे.
- पांढरकवडा वनविभागातील मारेगाव वनक्षेत्रात दिनांक २३.०३.२०२१ रोजी वाघीणीच्या झालेल्या मृत्यु प्रकरणामध्ये ३ आरोपींना अटक करण्यात आली होती. सदर प्रकरणी न्यायालयाकडून आरोपींना जामिनावर सोडण्यात आले असून पुढील न्यायीक कार्यवाही सुरु आहे.
- पांढरकवडा वनविभागातील मुकुटबन वनक्षेत्रात दिनांक २५.०४.२०२१ रोजी वाघीणीच्या झालेल्या मृत्यु प्रकरणामध्ये २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच दिनांक १९.०६.२०२१ रोजी पोलीस विभागाच्या मदतीने ५ संशयीत आरोपींना अटक करण्यात आली होती. सदर प्रकरणी न्यायलयाकडून आरोपींना जामिनावर सोडण्यात आले असून पुढील न्यायीक कार्यवाही सुरु आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सायबर सेल तयार करण्यात आला असून राज्यात शिकारीच्या घटना घडल्यास सायबर डाटाच्या (कक्षाच्या) मदतीने आरोपींचा शोध घेण्यात येतो. तसेच जिल्हास्तरीय व्याघ्र समितीच्या बैठकीत वाघ/ बिबट इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या उपाययोजनांची आखणी करण्यात येते. अवैध शिकारीचे व इतर गुन्हे शोधणे व पुढील कार्यवाही करण्याकरिता आवश्यकतेनुसार पोलीस विभागाची मदत घेण्यात येते व प्रकरण न्यायप्रविष्ट करण्यात येते. या अनुषंगाने वनअधिकारी / कर्मचाऱ्यांना वेळोवेळी कायदेविषयक उजळणी प्रशिक्षण देण्यात येते.

व्याघ्र व इतर वन्यप्राण्यांच्या शिकारीवर आळा घालण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर करण्यात येणाऱ्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत :-

- वन्यप्राण्यांचा मागोवा घेणे, कॅमेरा ट्रॅप लावणे.
- STPF पथकाद्वारे गस्त करणे, पावसाळ्यात विशेष गस्त करणे.
- गुप्त सेवा निधी उपलब्ध करुन देणे
- M-Stripes प्रणालीद्वारे वन्यप्राण्यांच्या गतिविधीवर लक्ष ठेवणे.
- विद्युत ट्रिपिंग वर लक्ष ठेवणे.
- पाणस्थळाची तपासणी करणे.

- संरक्षण कुटीतील वनमजुरांद्वारे वन्यप्राण्यांवर लक्ष ठेवणे.
- जंगलालगत विहिरीला कठडे बांधणे.
- जंगलात येणाऱ्या-जाणाऱ्या व्यक्तींची नोंद घेण्याकरीता मुसाफिर रजिस्टर ठेवणे, मुसाफिर लोकांचे डेरे तपासणे.
- वनातील / वनाशेजारी गावात जनजागृती करणे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिका हद्दीतील अनधिकृतपणे विकसित झालेल्या गुंठेवारीतील घरांबाबत

**(२०) * ३२६४७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजीपर्यंतच्या गुंठेवारी योजना अद्यापही नियमित झालेल्या नसल्याने त्या नियमित करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला असतांना त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या जमिनी अतिक्रमणाखाली आहेत अथवा विशिष्ट क्षेत्रामध्ये आहेत (ना-विकास क्षेत्र, हरित क्षेत्र, पर्यटन क्षेत्र, पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र, संरक्षण विभागाचे क्षेत्र इत्यादी.) त्यांना कायद्याप्रमाणे या योजनेचा लाभ घेता येणार नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिका हद्दीतील अनधिकृतपणे विकसित झालेली गुंठेवारीतील घरे नियमित होणार असून त्याची अंमलबजावणी सुरु झाली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे महानगरपालिका हद्दीतील मोठ्या प्रमाणावर झालेली बोगस गुंठेवारी प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये गुंठेवारी योजनेची अंमलबजावणी अद्याप सुरु नाही. तथापि, गुंठेवारी योजनेमध्ये प्रस्ताव मंजूरीकरीता कार्यप्रणाली निश्चितीबाबत पुणे महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(२) होय,

(३) गुंठेवारी योजनेमध्ये प्रस्ताव मंजूरीकरीता कार्यप्रणाली निश्चितीबाबत पुणे महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोंढवा परिसरातील निदर्शनास आलेल्या ३ बोगस गुंठेवारी प्रकरणाबाबत पुणे महानगरपालिकेकडून कोंढवा पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयातील अंबाजोगाई नगरपरिषद सभागृहासाठी लागणाऱ्या खुर्ची खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(२१) * ३४८९८ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील अंबाजोगाई नगरपरिषदेने मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह नूतनीकरणासाठी लागणाऱ्या वस्तूचा दरपत्रकाचा तक्ता बनवून सत्यम सोल्युशनचे दर सर्वात कमी असल्याचे मान्य करून प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण औरंगाबादचे अधिक्षक अभियंता यांचेकडे पाठविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दरपत्रकाची पाहणी करून सदरील अधिक्षक अभियंत्यांनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास कार्यकारी अभियंत्यास पत्र लिहून १ कोटी ५३ लाख ८० हजार ९३० रुपयांच्या तांत्रिक मान्यतेच्या अंदाजपत्रकावर गंभीर असे आरोप नोंदविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे जून-जुलै २०१९ मधील निविदेत ८० हजार ८०० रुपये दर देण्यात आले होते, परंतु सदरील अंदाजपत्रकात बाब क्रमांक १४ मधील सभागृहासाठी पुश बॅक कुशन खुर्च्या १९ हजार ६०० रुपये दाखविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेच्या खुर्चीचे दरपत्रक देणाऱ्या एबीसी सीट्स नवी दिल्ली आणि अंबाजोगाई नगरपरिषदेला खुर्च्या पुरवठा करणाऱ्या कंपनीच्या दरात मोठी तफावत असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अंबाजोगाई सभागृहाला लागणाऱ्या खुर्ची खरेदीमध्ये नगर परिषद सत्ताधारी, नगरपरिषद वरिष्ठ अधिकारी आणि कंपनी यांनी संगनमत करून गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

मुख्याधिकारी, अंबाजोगाई नगरपरिषद यांनी त्यांच्या दि.२६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांना अंदाजपत्रक पाठविले.

(२) सदर अंदाजपत्रकाबाबत अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांनी दि.१३ नोव्हेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, बीड यांच्या कार्यालयाला त्रुटी कळविल्या व तद्नंतर दि.१९ नोव्हेंबर, २०१९ रोजी प्रस्तुत अंदाजपत्रकाला अधिक्षक अभियंता यांच्या कार्यालयाने तांत्रिक मान्यता प्रदान केल्याचे दिसून येते.

(३) सदरील अंदाजपत्रकातील बाब क्रमांक १४ मध्ये रु.१९,९००/- दर्शविले आहे.

(४) हे खरे नाही.

नवी मुंबई महानगरपालिकेने एबीसी सीट्स, नवी दिल्ली यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे खुर्च्यांचे दरपत्रक घेतलेले नाही.

(५) व (६) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, बीड यांच्या स्तरावर चौकशी करण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील रस्ते कायमस्वरुपी खड्डेमुक्त करण्याबाबत

**(२२) * ३३२६८ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रस्त्यांवर मागील दोन दशकांत तब्बल २१ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले परंतु अजूनही मुंबईतील रस्ते खड्डे मुक्त झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॉक्रीट अथवा डांबरी रस्ते तयार करताना त्या कामाचा दर्जा राखणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे रस्ते कामातील गैरव्यवहाराबरोबरच दरवर्षी होणारा मुसळधार पाऊस, रस्त्यावर तुंबणारे पाणी, तसेच विविध कंपन्यामार्फत नवीन केबल टाकण्यासाठी होणारे सततचे खोदकामही तेवढेच जबाबदार असल्याचे दिनांक १९ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास महापालिकेचे रस्ते विभागाचे माजी प्रमुख अभियंता यांच्याकडून सांगण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्याचा दर्जा राखण्यासाठी नियोजनबध्द कार्यक्रम आखणे अपेक्षित असतानाही महापालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष व टाळाटाळ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन मुंबईतील खड्डे हे कायमस्वरुपी खड्डेमुक्त करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सन २००८ ते सन २०२१ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेतील रस्ते दुरुस्ती व सुधारण्याच्या कामाकरीता रु. १३.३६५ हजार कोटी इतका खर्च करण्यात आला असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात १२०० कि.मी. लांबीचे डांबराचे रस्ते आहेत. मुंबई क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होणारा पाऊस, शहराची भौगोलिक स्थिती, विविध सेवा उपयोगिता कंपन्यांमार्फत होणारे खोदकाम तसेच डांबराच्या गुणधर्मानुसार पावसाळ्यात पाण्याच्या संपर्कामुळे रस्त्यांना खड्डे पडतात, ही वस्तुस्थिती आहे.

परंतु, याबाबत दिनांक १९ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास महानगरपालिकेच्या रस्ते विभागाच्या माजी प्रमुख अभियंता यांच्याकडून सांगण्यात येणे, हे खरे नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच रस्त्यांवर पडलेले खड्डे ४८ तासांत बुजविण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) हे खरे नाही असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खड्डयांचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने १२ मी. पेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरणाद्वारे मजबुतीकरण/सुधारणा करण्याचे धोरण बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अवलंबिण्यात आले आहे. तसेच, सन २०२१-२२ पासून ६ मी. रुंदीवरील रस्त्यांचे टप्प्याटप्प्याने सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात येत आहे.

स्थायी तांत्रिक सल्लागार समिती (STAC) च्या निर्देशानुसार महानगरपालिकेमार्फत रस्ते दुरुस्ती व सुधारण्याची कामे करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे महापालिकेच्या दिवा प्रभागातील विविध कामांबाबत कारवाई केली नसल्याबाबत

**(२३) * ३२४७४ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिकेच्या दिवा प्रभागातील विविध कामांबाबत तसेच उद्भवणाऱ्या समस्यांबाबत संबंधित अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या पहाणी दौऱ्यानंतर दिनांक १३ जुलै २०२१ रोजी ठाणे महापालिकेच्या दिवा प्रभागातील संबंधित अधिकाऱ्यांसमवेत एक आढावा बैठक संपन्न झाली, हे खरे आहे काय,

(२) सदरहू बैठकीत एकूण १५ प्रमुख बाबी संदर्भात सविस्तर चर्चा झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत त्याची अंमलबजावणी करण्यात येईल असे आश्वासन लोकप्रतिनिधींना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू १५ बाबींसंदर्भात १५ दिवसांच्या आत कारवाई करण्याची ग्वाही संबंधित अधिकाऱ्यांनी आजमितीस दिलेली नसल्यामुळे लोकप्रतिनिधींनी आयुक्त, ठाणे महापालिका यांच्याकडे सविस्तर पत्र सादर करून, ठाणे महापालिका आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू विविध कामांबाबत तसेच उद्भवत असलेल्या समस्यांबाबत कोणतीही कारवाई न करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) दिवा प्रभागाअंतर्गत सुरु असलेल्या तसेच प्रस्तावित विविध विकास कामांच्या प्रगतीच्या अनुषंगाने प्रभाग समितीमध्ये संबंधित अधिकाऱ्यांसमवेत दिनांक १३.०७.२०२१ रोजी आढावा बैठक संपन्न झाल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(२), (३) व (४) सदरहू बैठकीत दिवा प्रभागा अंतर्गत विविध १५ विकास कामांच्या प्रगतीच्या अनुषंगाने तसेच सदर कामांची १५ दिवसांच्या आत अमंलबजावणी करण्याबाबत लोकप्रतिनिधींशी चर्चा झाल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, संबंधित लोकप्रतिनिधींनी उपरोक्त कामे अपूर्ण अवस्थेत असल्याचे निवेदन आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना दिले आहे.

दिवा प्रभागा अंतर्गत दिनांक १३.०७.२०२१ रोजी विकास कामांच्या आढावा बैठकीच्या अनुषंगाने सदर प्रभागा अंतर्गत विविध नागरी सुविधा उदा. रस्त्यांची दुरुस्ती, पुर्व पश्चिम भागांना जोडणाऱ्या पुलाचे काम, विविध विभागात ई-टॉयलेट उभारणे, स्मशानभूमीची डागडूजी इ. कामे सुरु करण्यात आली असून उर्वरित कामांबाबत सकारात्मक कार्यवाही सुरु असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर अग्निशमन यंत्रणा उभारण्याबाबत

**(२४) * ३३८६४ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर अपघात आणि अन्य कारणांमुळे वाहनांना आग लागण्याच्या घटनांमध्ये गेल्या काही वर्षांत वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गावर ज्वलनशील वायू, द्रव्य आणि पदार्थांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असून त्यामुळे महामार्गावर अग्निशमन यंत्रणा गरजेची आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परंतु या महामार्गावर अग्निशमन यंत्रणाच अस्तित्वात नसल्याने अनेक वेळा अपघात व आग लागल्यास मोठी दुर्घटना घडते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर अग्निशमन यंत्रणा उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) राज्यात महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ आणि महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ हे स्थानिक प्राधिकरण व नियोजन प्राधिकरण क्षेत्रात तसेच राज्यातील इतर सर्व भागात लागू झालेला आहे. त्याप्रमाणे मुंबई-अहमदाबाद महामार्गावर कोणतीही आपात्कालीन परिस्थिती उद्भवल्यास या महामार्गाजवळील बृहन्मुंबई, मिरा-भाईदर, वसई-विरार शहर महानगरपालिकांच्या तसेच पालघर, डहाणू या नगरपरिषदांच्या अग्निशमन सेवा आणि महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळाच्या तारापूर अग्निशमन केंद्राकडून मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर अग्निशमन सेवा पुरविण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जिल्हा जळगांव) येथील संभाजीनगर-इंदौर राष्ट्रीय महामार्ग रस्ता कॉंक्रिटीकरणाच्या निकृष्ट कामाची चौकशी करण्याबाबत

**(२५) * ३३३१४ श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जिल्हा जळगांव) येथील संभाजीनगर-इंदौर राष्ट्रीय महामार्ग रस्ता कॉंक्रिटीकरणाच्या कामाच्या निष्कृष्टतेची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे ऑक्टोबर, २०२१ पासून वारंवार लेखी निवेदनाद्वारे मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दि.०१.१०.२०२१ पासून आजपावेतो सदर महामार्गाच्या कामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील अमृत योजनेंतर्गत पाणीपुरवठ्याच्या चुकीच्या डीपीआरमुळे अधिकचा आर्थिक भुर्दंड बसल्याबाबत

**(२६) * ३४३९० श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरालगतच्या भागातील वसाहतींना पाणी पुरवठा करण्याकरीता अमृत योजनेंतर्गत डीपीआर तयार करण्याचे काम मे.वेबकासट कंपनीला दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीने चुकीचा डीपीआर तयार केल्याने २२६ कोटींचा प्रकल्प ३५० कोटींवर गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनीला डीपीआर तयार करण्यास ७.५० कोटींची रक्कम अदा केली आहे काय, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन चुकीच्या डीपीआरमुळे मनपाला अधिकचा १२४ कोटींचा भुर्दंड बसल्यामुळे संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

अमृत अभियानांतर्गत नागपूर पाणीपुरवठा प्रकल्पातील सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करण्याचे काम मे. डि.आर.ए.कन्सलटंट, नागपूर यांना देण्यात आले होते.
(२) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत रुपये २२६.६९ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक २८.१०.२०१६ रोजी प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली होती.

तद्‌नंतर सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया नागपूर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आली होती. मात्र, सदर निविदेस अल्प प्रतिसाद व जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्या.

जास्त दराच्या प्राप्त होणाऱ्या निविदा लक्षात घेवून सदर प्रकल्पास चालू दरसूचीवर रुपये २७३.७८ कोटी किंमतीस सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

तसेच, भारत सरकारचा उपक्रम असलेली मे. वाप्कोस लि. यांना रुपये २७२.०२ कोटीमध्ये ठेव तत्वावर काम देण्यात आले.

या अनुषंगाने दिनांक ०१.०८.२०१८ रोजी मे.वाप्कोस लि. सोबत नागपूर महानगरपालिकेने करारनामा केला. यानुसार या प्रकल्पात अंतर्भूत ४३ जलकुंभाकरीता आवश्यक जागा, ३ महिन्यात म्हणजेच ऑक्टोबर, २०१८ पर्यंत मे. वाप्कोस लि. यांना हस्तांतरित करावयाच्या होत्या मात्र, सदर जागा विविध प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रात असल्यामुळे तसेच, आजूबाजूच्या रहिवाशी नागरिकांचा जलकुंभ बांधण्यास विरोध असल्यामुळे जागांचा ताबा घेवून विहीत मुदतीत मे. वाप्कोस लि. यांचेकडे हस्तांतरित करणे नागपूर महानगरपालिकेस शक्य झाले नाही.

या दरम्यान बांधकाम साहित्याच्या दरात वाढ झाल्यामुळे प्रकल्प किंमतीत वाढ झाली हे खरे आहे.

(३) नागपूर पाणीपुरवठा प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर) तयार करण्याचे काम नागपूर महानगरपालिकेने मे. डि. आर. ए. कन्सलटंट, नागपूर यांना रुपये १.०७ कोटी किंमतीत दिले होते. सदर रक्कम मे. डि. आर. ए. कन्सलटंट, नागपूर यांना नागपूर महानगरपालिकेने अदा केली आहे.

(४) व (५) मे.वाप्कोस लि. सोबत केलेल्या करारनाम्यानुसार, सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) मध्ये नमूद जलकुंभाकरीता आवश्यक जागा करारनाम्याच्या दिनांकापासून ३ महिन्यात मे. वाप्कोस लि. यांना हस्तांतरित करावयाची जबाबदारी महानगरपालिकेची होती. मात्र, सदर जागा विविध प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रात असल्यामुळे जागांचा ताबा घेवून विहित मुदतीत हस्तांतरित करणे महानगरपालिकेस शक्य झाले नाही. त्यामुळे, महानगरपालिकेस जादाचा भुर्दंड बसला असे म्हणणे संयुक्तीक होणार नाही.

-----------------

## मुंबईतील वाळकेश्वर येथील ऐतिहासिक बाणगंगा तलावातील हजारो मासे मृत्यूमुखी पडल्याबाबत

**(२७) * ३३४८१ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाळकेश्वर येथील ऐतिहासिक बाणगंगा तलावातील जवळपास हजारो मासे मृत्यूमुखी पडले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाणगंगा या ऐतिहासिक तलावात विविध प्रकारच्या प्रजातीचे मासे असतानाही पुरेशा प्रमाणात प्राणवायू न मिळाल्याने तलावातील पाणी मोठ्या प्रमाणात प्रदुषित झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ऐतिहासिक बाणगंगा तलावाची नियमितपणे देखरेख आणि साफसपाई न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या कारणांच्या अनुषंगाने पुन्हा तलावातील प्राणवायू कमी होऊन पाणी प्रदुषित होणार नाही यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बाणगंगा तलाव जीएसबी टेम्पल ट्रस्ट यांच्या खाजगी मालकीचे असल्याने तलावाची नियमितपणे देखरेख व साफसफाई करण्याची जबाबदारी जीएसबी टेम्पल ट्रस्ट यांची आहे. परंतु, पितृपक्ष श्राध्दविधी व इतर महत्वाच्या कार्यक्रमांदरम्यान स्वच्छता व साफसफाई राखण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कर्मचारी तैनात करण्यात येतात.

(४) बाणगंगा तलावामध्ये पितृपक्ष श्राध्दविधी दरम्यान प्राणवायू कमी होऊन पाणी प्रदूषित होते. त्यामुळे यापुढे पितृपक्ष श्राध्दविधी दरम्यान तलावातील प्रदुषण रोखण्यासाठी कृत्रिम तलावांची व्यवस्था करणे प्रस्तावित असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुसावळ शहरातील पथदिवे २४ तास सुरु असल्याने वीजेचा होत असलेला अपव्यय

**(२८) * ३३३०४ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ शहरातील सुमारे ६०० पथदिवे माहे डिसेंबर २०१९ मध्ये दोन महिन्यापासून २४ तास सुरु असल्याने वीजेची उधळपट्टी होत सुमारे १ लक्ष ८१ हजार रुपयांची विजेची नासाडी झाली असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी वीज वितरण आणि नगरपालिका यांच्यासोबत माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान बैठक घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर नुकसानाची भरपाई कोणाकडून वसूल करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर काम केलेल्या एनर्जी एफीशिएंसी सर्विसेस लिमिटेड (EESL) या कंपनीच्या देयकातून रु.१,८१,०००/- इतक्या रकमेची कपात करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बावधन (जि.पुणे) परिसरातील बिग बास्केटच्या गोदामाला आग लागून कोट्यवधी रुपयांचे झालेले नुकसान

**(२९) * ३२६६३ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील बावधन परिसरातील बिग बास्केटच्या गोदामाला आग लागून कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०२१ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) बिग बास्केट गोडावून, उत्तमनगर, बावधन बुद्रुक, पुणे येथील पत्राशेडच्या गोडावूनमध्ये दि. १२/०९/२०२१ रोजी रात्री आग लागून वित्त हानी झाली होती, हे खरे आहे.

या आगीमध्ये गोडावून मधील विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या जिवनावश्यक वस्तू, गृहपयोगी वस्तू, दुचाकी वाहने जळाली असून, तीनचाकी टेम्पो, चारचाकी टेम्पो यांना आगीची झळ बसून नुकसान झाले आहे.

तसेच ऑफिस फर्निचर, ए.सी. मशीन, फ्रीज व डीफ्रीजर तसेच लोखंडी कपाटातील २ लाख रुपये जळाल्याचे दिसून आले आहे.

सदरची आग इलेक्ट्रीक शॉर्ट सर्कीटमुळे लागल्याचे निदर्शनास आले असल्याचे अग्निशमन दल व विद्युत निरिक्षक यांनी अहवालात नमूद केले आहे.

आगीचे मोठे स्वरुप लक्षात घेवून पुणे अग्निशमन दलाकडून तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वाहनामार्फत आग पूर्णत: विझविण्यात आली आहे.

सदर जळीत घटनेमध्ये कोणत्याही प्रकारची जिवितहानी किंवा कोणीही जखमी झालेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजने अंतर्गत निलंगा नगरपरिषदेस रस्ते विकास कामासाठीच्या निधी मंजूरीबाबत

**(३०) * ३४०१५ श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निलंगा (जि.लातूर) शहरातून जाणारे राज्य मार्ग क्र.२४४ उदगीर मोड ते लातूर रोड निंबाळकर पेट्रोल पंपपर्यंतचा कॉक्रीट रस्ता डिव्हायडर व नाल्यासह व बँक कॉलनी मैन रोड डी.पी.रस्ता शिवाजी चौक ते हलकर्षा दर्गा पर्यंतचा राज्य मार्ग क्र.२३८ रस्ता कॉक्रीट व डांबरीकरण नाल्यासह करण्याच्या प्रकल्पास नगरविकास विभाग यांचे पत्र क्र.नगरो-२०१९/प्र.क्र.१९३ (१) नवि-३३ दिनांक ०५/०९/२०१९ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) मंजूरीस सादर करण्यात आला असून, सदरील सविस्तर प्रकल्प अहवालाची किंमत रू.७२.८५ कोटी इतकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजने अंतर्गत निलंगा नगरपरिषदेस निलंगा शहरातील मुख्य रस्ते विकास करणेसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे** : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर) अंतर्गत निलंगा शहरातील रस्ते विकास प्रकल्पास निधी उपलब्ध करून देण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे जानेवारी, २०२० मध्ये निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे.

तथापि, सदर रस्ते प्रकल्पाबाबत प्रस्ताव नगरपरिषदेने नगर परिषद प्रशासन संचालनालयाकडे सादर केलेला असून सदर प्रस्तावात काही बाबींची पूर्तता करून फेरप्रस्ताव सादर करण्याच्या सूचना नगर परिषद प्रशासन संचालनालयामार्फत दिनांक २८.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये निलंगा

नगरपरिषदेस कळविले असून सद्यस्थितीस सदर प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करण्याची कार्यवाही निलंगा नगरपरिषद स्तरावर चालू आहे.

-----------------

## मंडणगड-दापोली (जि.रत्नगिरी) तालुक्यांना जोडणाऱ्या केळशी पुलाचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(३१) * ३३२४६ श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंडणगड-दापोली (जि.रत्नगिरी) तालुक्याला जोडणाऱ्या केळशी पुलाचे बांधकाम गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे सप्टेबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यांना जोडणाऱ्या केळशी पुलाचे बांधकाम तातडीने व्हावे याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.नगरविकास मंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सागरी महामार्गावरील मंडणगड-दापोली तालुक्यांना जोडणाऱ्या केळशी पुलाचे बांधकाम प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू केळशी पुलाकरिता निधीची तरतूद करून बांधकाम तातडीने हाती घेण्याच्या दृष्टीने शासनाने सत्वर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., मुंबई यांना दिलेले दि.१९.०९.२०२१ चे पत्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास दि.२२.१०.२०२१ रोजी प्राप्त झालेले आहे.
(३) माहे, एप्रिल, २००७ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठात पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ च्या अनुषंगाने वाळूचे डोंगर वगळून, प्रस्तावित पुलांची

संरेखा करुन, बांधकाम हाती घेण्याबाबत पीआयएल/१५७/२००६ अन्वये मागणी करण्यात आली. मा.खंडपीठाने सदर याचिकेची सुनावणी घेऊन दिनांक १४.०७.२००७ रोजी कामास स्थगिती दिली आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार पुलाची नवीन आखणी नकाशा (वाळूचे डोंगर वगळून) तयार करण्यात आला व त्यानुसार प्रत्यक्षात काम करणार आहे असे, प्रतिज्ञापत्र मा.उच्च न्यायालयात, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांनी दिनांक २९.११.२०१५ व जुलै, २०१८ रोजी दाखल करुन स्थगिती उठवण्याबाबत विनंती केली आहे. त्याअनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ०३.०८.२०१८ रोजी सदरचे स्थगिती आदेश रद्द केले आहेत.

(४) सदर काम शासन आदेश क्रमांक खाक्षेस-२०२०/प्र.क्र.२६६/रस्ते-८, दिनांक ३०.०९.२०२० नुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या. यांच्याकडे हस्तांतर करण्यात आलेला आहे.

या पुलाचा सुधारीत प्रस्ताव तयार करुन सादर करण्याबाबत मे.मोनार्च सर्व्हेअर्स अँड इंजिनियरींग कन्सल्टंट यांना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या. मुंबई मार्फत दिनांक ३०.०८.२०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे व सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुळींजगाव, नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील आदिवासी यांची फसवणूक करून अनधिकृत इमारत बांधल्याबाबत

**(३२) * ३४५९१ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळींजगाव, नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील खाते क्रमांक २८ मधील जागेवर तेथील आदिवासी यांची फसवणूक करून युनिवर्सल ग्रुप या विकासकाने तेथे अनधिकृत इमारत बांधल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकासकाने साईलीला या इमारतीचे काम सुरु करतेवेळी शौचालय टाकीवर पिलर उभे केले असल्याबाबत आणि तेथील रहिवाशांना खोटी नोंदणी करून फसविल्याबाबत तेथील रहिवाशांनी माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मा.नगरविकास मंत्री, प्रधान सचिव, नगरविकास विभाग व आयुक्त वसई-विरार नगरपालिका यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) तुळींजगाव, नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील खाते क्रमांक २८ या जागेवर विकासकामार्फत बनावट सी.सी. वापरून इमारतीचे अनधिकृत बांधकाम केले असल्याची वस्तुस्थिती वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, सन २०१६ मध्ये सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवानगी रद्द करुन सदरील जागेवरील बांधकाम सुरू असलेल्या दोन इमारती तात्काळ निष्कासित केल्या असून अन्य चार इमारतींबाबत नियमानुसार  कार्यवाही करण्यात आली होती.

तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी सद्यस्थितीत खाते क्र.२८ या जागेवर स्थळपाहणी अंती कोणत्याही प्रकारचे बांधकाम शौचालय टाकीवर झाल्याचे किंवा साईलिला इमारतीचे बांधकाम असल्याचे निदर्शनास आले नसल्याची वस्तुस्थिती वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी खाते क्र.२८ या जागेवर स्थळपाहणी करुन अनधिकृत बांधकाम असल्यास त्यावर तात्काळ नियमोचित कार्यवाही करण्याचे आदेश आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील जव्हार नगरपरिषदेने शहरातील विकासकामांमध्ये केलेला गैरव्यवहार

**(३३) * ३४१०८ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जव्हार नगरपरिषद तर्फे हाती घेण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज उद्यान सुशोभीकरण, शैक्षणिक संकूल, पाचबत्ती ते चाऊस घर दरम्यान संरक्षक भिंत (रिटेनींग वॉल) राणी प्रियावंदा उद्यान सुशोभिकरण इत्यादी विकास कामाच्या अंदाज पत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता मिळवण्यापूर्वी तांत्रिक मान्यता शुल्काचा भरणा न करताच बनावट सही-शिक्का, तांत्रिक मान्यता जोडल्याच्या प्रकरणात जिल्हाधिकारी कार्यालयांची कोट्यावधी रुपयांची फसवणूक केल्याची गंभीर बाब माहे, ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने शासनाची फसवणूक करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) प्रश्नात नमुद असलेल्या चार कामांपैकी छत्रपती शिवाजी महाराज उद्यान सुशोभिकरण या एका कामाच्या अंदाजपत्रकावरील तांत्रिक मान्यतेचे सही व शिक्के खोटे असल्याचे निदर्शनास आले, अशी वस्तुस्थिती जव्हार नगरपरिषदेने कळविली आहे.
(२) व (३) सदरची बाब निदर्शनास आल्यानंतर जव्हार नगरपरिषदेमार्फत जव्हार पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरीता जिल्हाधिकारी, पालघर यांनी दि.०९/११/२०२१

रोजीच्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, जव्हार यांची चौकशी समिती नियुक्त केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाशिम जिल्ह्यातील कारंजा-येवता-इंझा मार्गे नेरकडे जाणाऱ्या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३४) * ३५२५६ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील कारंजा-येवता-इंझामार्गे नेरकडे जाणाऱ्या मार्गाची अवस्था अत्यंत दयनिय झाली असून या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मार्गाच्या या अवस्थेमुळे कारंजा आगाराने या मार्गावरील बस सेवा बंद केली असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तातडीने हा रस्ता दुरुस्ती करून प्रवाशांना व नागरिकांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर १७.२० कि.मी. लांबीपैकी ०/०० ते ५/०० या लांबीमध्ये रस्ता सुस्थितीत असून, कि.मी. ५/०० ते १७/२०० या लांबीमध्ये अतिवृष्टीमुळे खड्डे पडले आहेत.

(२) हे खरे नाही.

या मार्गावरील बस फेरीला भारमान कमी असल्यामुळे सदर बस सेवा बंद करण्यात आली आहे.

(३) या रस्त्यावरील सर्व खड्डे भरुन रस्ता सुस्थितीत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जयगड (जि.रत्नागिरी) येथील जे.एस.डब्ल्यू कंपनीच्या ब्रेकवॉटर वॉलमुळे समुद्र किनाऱ्याजवळील लोकवस्तीमध्ये लाटांचे पाणी शिरल्याबाबत

**(३५) * ३५०३८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील मौजे वेळणेश्वर, साखरी आगर, कोंडकारूळ, बुधल, अंजनवेल, तवसाळ (ता.गुहागर) आदी गावांत माहे जून २०१७ तसेच दिनांक १३ ते १७ जुलै, २०१८ व त्यानंतरही सातत्याने लाटांचे पाणी लोकवस्तीत शिरल्याने येथील रहिवाशांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे तसेच घरे व नारळी पोफळीच्या बागांचे सातत्याने मोठे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जयगड (ता.रत्नागिरी) येथील जे.एस.डब्ल्यू कंपनीने बांधलेल्या ब्रेकवॉटर वॉलमुळे लाटांची उंची वाढून पाणी लोकवस्तीत शिरते, असा निष्कर्ष केंद्रीय जल आणि विदयुत अनुसंधान केंद्र, खडकवासला, पुणे यांचेमार्फत केलेल्या अभ्यासाच्या अनुषंगाने त्यांनी दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी दिलेल्या अहवालात नमूद केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ जुलै, २०१७ तसेच दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी तसेच तद्नंतर सतत शासनाकडे पत्रव्यवहार करून कंपनीवर कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन केंद्रीय जल आणि विदयुत अनुसंधान केंद्र, खडकवासला, पुणे यांनी दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने कंपनी प्रशासनावर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय. अंशत: खरे आहे.

(२) केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (CWPRS), खडकवासला, पुणे यांच्या दि.८.८.२०१८ च्या अहवालानुसार दि.१३ ते १७ जुलै, २०१८ च्या

कालावधीत लोकवस्तीत शिरलेले पाणी हे ब्रेकवॉटर वॉलमुळेच शिरले आहे, याचा सखोल अभ्यास करण्याच्या दृष्टीने जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून प्राप्त माहिती केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (CWPRS), खडकवासला, पुणे यांना पाठविण्यात आली आहे. मात्र त्यांनी सदर माहिती अपुरी असून अधिकची माहिती पाठविण्याबाबत कळविले आहे. त्यास अनुसरुन मागविण्यात आलेली अधिकची माहिती जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून दि.१७.६.२०२० रोजी प्राप्त झाली आहे. सदर माहिती पत्तन अभियंता, रत्नागिरी यांचे दि.१९.६.२०२० चे पत्रान्वये केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (CWPRS), खडकवासला, पुणे यांना पाठविण्यात आली आहे. मात्र केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (CWPRS), खडकवासला, पुणे यांनी त्यांचे दि.९.७.२०२० चे पत्रान्वये Shoreline Evaluation Studies ही अधिकची माहिती मागितली असून पत्तन अभियंता, रत्नागिरी यांनी जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून सदर माहिती मागविली आहे. जे.एस.डब्ल्यु. जयगड यांनी विचारणा केल्यानुसार National Centre for Sustainable Coastal Management (MoEFCC-GoI) Shoreline Evaluation Studies द्वारे Shoreline Evaluation Studies करण्यासाठी जे.एस.डब्ल्यु. जयगड यांना पतन अभियंता, रत्नागिरी यांनी त्यांचे ११.१२.२०२० व दि.१३.७.२०२१ चे पत्रान्वये कळविले आहे. जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून सदर माहिती अद्याप अप्राप्त आहे.

(३) होय.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एरंडोल-म्हसावद (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील रस्त्याचे व रस्त्यावरील मोऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(३६) * ३५३११ श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एरंडोल-म्हसावद (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील रस्त्याचे व रस्त्यावरील मोऱ्यांचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, एरंडोल यांच्या निदर्शनास आणूनही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, सदर कामाची तपासणीकरून निकृष्ट दर्जाच्या मोरींच्या व रस्त्याच्या कामासंदर्भात शासन स्तरावरून चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, एरंडोल यांच्या निदर्शनास आणले होते. सदर रस्त्यावरील काम हे सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जामनेरमार्फत प्रगतीत आहे. किरकोळ स्वरूपाची दुरूस्ती करून तक्रारीचे निरसन करण्यात आलेले आहे. सदर रस्त्याचे व रस्त्यावरील मो-यांचे काम करारनाम्यानुसार करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नायगाव (जि.नांदेड) येथील के.टी.कंन्स्ट्रक्शन कंपनीची निविदा रद्द करण्याबाबत

**(३७) * ३३६२९ श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगाव (जि.नांदेड) येथील कुंडलवाडी-धर्माबाद ते राज्यसिमा रस्त्याच्या कामाची निविदा के.टी.कंन्स्ट्रक्शन कंपनीच्या नावे निघून २ वर्षे झाले तरी अद्‌याप रस्त्याचे काम सुरु न झाल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०२१ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा रस्ता कुंडलवाडी-धर्माबाद ते राज्यसिमा म्हणजेच तेलंगाणा राज्यातील तीर्थक्षेत्र बासर कडे जाणाऱ्या रस्त्याचे काम अगदी अपडेट व्हावे

यासाठी हायब्रीड अन्युटी अंतर्गत या कामाची निविदा काढण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीच्या नावे वर्क ऑर्डर निघून २ वर्षे झाले तरी कंपनीने रस्त्याचे काम सुरु केले नाही, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, के.टी.कंन्स्ट्रक्शन कंपनीची निविदा रद्द करुन शासनाने दुसरी निविदा न काढण्याचे सर्वसाधारण कारणे काय ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) दि. ०७/०८/२०२१ रोजीच्या वृत्तपत्रात ही बातमी आली आहे हे खरे आहे.

तथापी, कुंडलवाडी ते धर्माबाद ते राज्यसिमा या भागातील काम प्रगती पथावर आहे.

(२) होय, हे खरे आहे.

कुंडलवाडी ते धर्माबाद ते राज्यसिमा ही लांबी महाराष्ट्र व तेलंगाणा या दोन राज्यांना जोडणारी लांबी असल्यामुळे सदर लांबीचा समावेश हायब्रीड ॲन्युईटीच्या पॅकेज क्र. AU- १०५ करण्यात आला असुन निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यांत आली आहे.

(३) विषयांकित कामाचे कार्यारंभ आदेश दि.०७.०३.२०१९ रोजी निर्गमीत करण्यात आले असुन, उद्योजकाने कामाचे आदेश प्राप्त होताच कामाचे सर्वेक्षण सुरु करुन प्रत्यक्षात मे-२०१९ मध्ये, खानापुर ते थडी हिप्परगा कि.मी. ७४/५०० ते १०२/१०० या लांबीमध्ये कामास सुरुवात केली होती. परंतु मार्च-२०२० मध्ये उद्भवलेल्या कोव्हीड- १९ च्या प्रादुर्भावामुळे तसेच जुलै ते सप्टेंबर २०२० व जुलै ते सप्टेंबर २०२१ मधील अतिवृष्टीमुळे कामाच्या गतीवर अंशत: परिणाम झाला आहे. प्रश्नांकित कुंडलवाडी धर्माबाद राज्यसिमा या रस्त्याच्या भागातील काम प्रगतीपथावर असून कोवीड-१९ मुळे कंत्राटदारास जुन २०२२ पर्यंत मुदतवाढ प्रस्तावित आहे. या वाढीव मुदतीत प्रश्नांकित रस्त्याचे काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) उद्योजकाने काम सुरु करण्याचे आदेश प्राप्त होताच कामास सुरुवात केले असुन आजपर्यंत उद्योजकाने २ माईल स्टोनचे काम पुर्ण केले असुन

तिसऱ्या माईल स्टोनचे काम प्रगीतपथावर आहे. शासन निर्णय दि. २९ जुलै २०२० अन्वये सुध्दा कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे कंत्राटदारास १८० दिवस कामाची मुदत वाढवुन देणेबाबत शासनाचे आदेश आहेत. तसेच सलग २०२० व २०२१ या दोन्ही वर्षी अतिवृष्टीची नोंद झाली होती. वरील सर्व बाबीमुळे कामाची गती अंशत: मंदावलेली आहे. तसेच सगरोळी फाटा (कारला फाटा) ते कुंडलवाडी या किमी १११/३५० ते किमी ११९/८५० किमी लांबीतील भुसंपादान प्रक्रीया अंतीम टप्यात आहे. त्यामुळे कंत्राटदारास जुन २०२२ पर्यंत मुदतवाढ प्रस्तावित आहे. त्यामुळे मे. के. टी. कंन्स्ट्रक्शन मार्फत (वाढीव मुदतीत) जुन २०२२ पर्यंत पुर्ण करुन घेण्याबाबत नियोजन करण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी नव्याने निविदा काढून काम करुन घ्यावयाचे झाल्यास त्यावरील वाढ व कायदेशीर गुंतागुत यामुळे भविष्यात काम रेगांळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते, यामुळे सद्यस्थितीतील आहे त्या कंत्राटदारामार्फत वाढीव मुदतीत काम पुर्ण करुन घेणे शासन हितार्थ असणार आहे.

(५) कोवीड-१९, वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मधील अतिवृष्टी मुळे कामाच्या गतीवर परिमाण झाल्याने मुदतवाढ देवून काम पुर्ण करणे क्रमप्राप्त असल्याने विलंब दिसून येतो.

-----------------

## गट 'क' व 'ड' वर्गातील शासकीय पदे भरण्यासाठी महा आयटीकडून पॅनेलवर नेमण्यात आलेल्या कंपन्यांची भरती परवानगी रद्द करणेबाबत

**(३८) * ३५३०६ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मुंबई (महा आयटी) यांचेकडून भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कार्यकक्षेतील गट ब (अराजपत्रित) व गट क वर्गातील पदे सरळसेवेने भरण्यासाठी सर्विस प्रोव्हायडरची निवड करण्याची कार्यवाही करण्यात येऊन पाच कंपन्यांचा समावेश एमपॅनलमेंटवर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी मे.न्यास कम्युनिकेशन्स प्रा. लि.या कंपनीमार्फत आरोग्य विभागातील गट क व गट ड वर्गाच्या ६,२०५ पदांसाठी परीक्षा आयोजित करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीच्या ढिसाळ नियोजनामुळे उमेदवारांना पाठविण्यात आलेल्या परीक्षेसाठीच्या ओळखपत्रांमध्ये अपुरी व चुकीची माहिती आढळून आल्याने सदर परीक्षा ऐनवेळी पुढे ढकलावी लागली होती व त्याचा त्रास परीक्षा केंद्राच्या शहरात पोहोचलेल्या सुमारे आठ लाख परीक्षार्थींना सोसावा लागला होता, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, नव्याने नेमण्यात आलेल्या परीक्षेच्या दिवशी म्हणजे दिनांक २४ ऑक्टोबर, २०२१ रोजीही प्रश्नपत्रिका मिळण्यात विलंब, चुकीच्या पदाच्या परीक्षा प्रश्नपत्रिका मिळणे, बैठक क्रमांकाची चुकीची नोंद होणे यासारखे प्रकार घडून कंपनीच्या परीक्षा आयोजनातील हलगर्जीपणा पुन्हा एकदा निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,तसेच या परीक्षेमध्ये उत्तीर्ण करण्यासाठी दलालांकडून पाच ते दहा लक्ष रुपये विद्यार्थ्यांकडे मागितले जात असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर कंपनीसह पॅनेलवरील अन्य काही कंपन्यांचा समावेश काही संस्थांनी यापूर्वीच काळ्या यादीत केलेला आहे, मात्र कंपन्यांच्या काळ्या यादीतील समावेशाची तपासणी करण्याबाबत कोणतीही यंत्रणा महा आयटीकडे नसल्याचे स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी व भावनांशी खेळणाऱ्या या खासगी कंपन्यांना शासकीय पदांची प्रवेश प्रक्रिया करण्याची दिलेली परवानगी काढून घेऊन या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) हो हे खरे आहे.

(२), (३) व (४) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत त्यांच्या अखत्यारितील आरोग्य विभागाच्या परिक्षेकरिता Empanelment वर नेमलेल्या ५ कंपन्यांपैकी न्यास कम्युनिकेशन प्रा.लि. या कंपनीची निवड केली हे खरे आहे.

आरोग्य विभागाच्या गट-क व गट-ड पदभरतीसाठी न्यास कम्युनिकेशन प्रा.लि. दिनांक २५ व २६ सप्टेंबर रोजी परिक्षा घेणार होते. तथापि, सदर कंपनीने दिनांक २४/०९/२०२१ रोजी सदर परिक्षा घेण्यास असमर्थता दर्शविली त्यामुळे सदर परिक्षा पुढे ढकलण्यात येऊन दि.२४ व ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजी घेण्यात आल्या. सदर परिक्षा ऐनवेळी पुढे ढकलावी लागल्याने त्याचा त्रास परिक्षा केंद्रात पोहचलेल्या परिक्षार्थींना सोसावा लागला, हे खरे आहे.

दिनांक २४/१०/२०२१ रोजीच्या प्रश्नपत्रिका मिळण्यास विलंब, चुकीच्या पदांच्या प्रश्नपत्रिका मिळणे व परिक्षेमध्ये कंपनीच्या परिक्षा आयोजनातील हलगर्जीपणा निदर्शनास आला. त्याअनुषंगाने १२ संवर्गाची फेरपरीक्षा घेण्यात आली.

(५) व (६) महाआयटीकडून प्रसिद्ध केलेल्या निविदेत भाग घेतलेल्या सर्व कंपन्यांची तांत्रिक पडताळणी अतिशय काटेकोर पद्धतीने पार पाडण्यात आली. निविदा प्रक्रियेत, निविदादाराकडून ब्लॅक लिस्टिंग संदर्भात प्रतिज्ञा पत्र घेतले आहे की तो केंद्र शासन किंवा इतर कोणत्याही राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाकडून, निविदा दाखल करताना ब्लॅक लिस्ट किंवा बहिष्कृत झालेला नाही. निविदा प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेल्या निविदांची ब्लॅक लिस्टिंग संदर्भात पडताळणी, इंटरनेटवर उपलब्ध असलेली माहिती अथवा कोणी प्रतक्ष्य उपलब्ध करून दिलेली माहिती यावर अवलंबून असते. या इंटरनेट वर उपलब्ध माहितीच्या आधारे पाच (५) कंपन्यांकडून अतिरिक्त माहिती मागवण्यात आली. ज्या शासकीय / निमशासकीय विभागांनी बिडर्स ब्लॅक लिस्ट केले त्यांच्याकडे त्याचा खुलासा मागवण्यात आला व त्यानुसार काही बिडर्स अपात्र ठरले. याबाबत पडताळणी करून दोन (२) कंपन्यांना या निविदा प्रक्रियेतून अपात्र करण्यात आले.

शासन परिपत्रक साप्रवि दि. १७/०८/२०२० अन्वये दिलेल्या सर्व निर्देशांची अंमलबजावणी व संनियंत्रण सर्व जबाबदारी सर्व संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची राहील.

-----------------

## नागपूर शहरातील अजनी लोहपुल जिर्ण स्थितीत असल्याने वाहतुकीसाठी धोकादायक असल्याबाबत

**(३९) * ३४३१८ श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील १०० वर्षे पूर्ण झालेले ब्रिटिशकालीन अजनी रेल्वे पूल जिर्ण झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिर्ण ब्रिटिशकालीन रेल्वे पुलाची १९८५ ला पाहणी करण्यास तज्ञ समिती येवून सदर पूलाची २५ वर्षे मुदत असल्याचे सागून आता सदर पूलाची मुदत संपुष्टात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन किंवा तीन महिन्यात अजनी पूलावर वेगवेगळया प्रकारची कामे होत असतात हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व संबंधित विभागाचे मंत्री यांना लेखी पत्र देवून अद्यापही सदर पूलाच्या दुरुस्तीच्या प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नागपूर महानगरपालिकेने १३८ कोटी रूपयांचा ढोबळ प्रस्ताव तयार केला असून अद्याप कोणतीही कार्यवाही महानगरपालिका किंवा राज्यशासन यांच्याकडून झालेली दिसत नसणे, तसेच नागपूरमधील अजनी रेल्वे पूल हा नागरिकांच्या दृष्टीने धोकादायक असून या पूलाची मुदत संपल्याचे पत्र ब्रिटिशांनी रेल्वे प्रशासनाला दिले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर पूल बांधकामास शासन तातडीने मंजूरी देणार आहे काय वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) अजनी येथील अस्तित्वातील लोह पूल महानगरपलिकेच्या हद्दीत असून नगर विकास विभागामार्फत मुख्य अभियंता, महानगरपालिका, नागपूर यांनी हे खरे असल्याचे कळविले आहे.

(२) सदर माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उपलब्ध झाल्याचे दिसून येत नाही.

(३) नगर विकास विभागामार्फत मुख्य अभियंता, महानगरपालिका, नागपूर यांनी देखभाल दुरुस्तीची किरकोळ स्वरुपाची कामे, उदा.खड्डे भरणे, फुटपाथ

दुरुस्ती, रेलींग दुरुस्ती इत्यादी महानगरपालिकेमार्फत करण्यात येतात, असे कळविले आहे.

(४) अशा आशयाचे मा.लोकप्रतिनिधींचे पत्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उपलब्ध झाल्याचे दिसून येत नाही.

(५) सदर बाबत नगर विकास विभागामार्फत मुख्य अभियंता, महानगरपालिका, नागपूर यांनी पुढीलप्रमाणे कळविले आहे :-

अस्तित्वातील जुन्या रेल्वे पूलाऐवजी नविन रेल्वे पूल बांधण्याकरिता सन २०१३ मध्ये तांत्रिक सल्लागार यांनी दिलेल्या विकल्पानुसार रु.१३८ कोटी रकमेचा ढोबळ खर्च अपेक्षित केला होता. सद्यस्थितीत निम्नतम विकल्पाची अंदाजीत किंमत रु.२७५ कोटी होईल. महानगर पालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता ऐवढया मोठा प्रमाणात निधीची उपलब्धता होणे शक्य नाही, करीता शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे व मध्य रेल्वे विभागातर्फे अजनी रेल्वे पूलाचे बांधकाम करण्यात यावे याबाबत विनंती करण्यात आली आहे.

(६) केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत नागपूर शहरातील अजनी येथील रस्त्याच्या बाजूला इंटर मॉडेल स्टेशन बांधणे प्रस्तावित असल्याने त्याचा भाग म्हणून आठ पदरी आरओबी (ROB) बांधणे प्रस्तावित असल्याचे प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले असून प्रस्तुत प्रकरणी पुढीलप्रमाणे सदयस्थिती कळविली आहे :-

सदयस्थितीत सदर प्रस्तावित उड्डाणपूलाच्या संकल्पनात्मक सर्वसाधारण आराखडयास (GAD) रेल्वे विभागाकडून दिनांक २२ मार्च, २०२१ रोजी मंजुरी प्राप्त झाली आहे. तथापी, सदर प्रकल्पाकरिता तेथील सुमारे ४९३० झाडे बाधित होत असल्याने वृक्ष कटाई / प्रत्यारोपणाबाबतच्या प्रस्तावास भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून दिनांक १५ मे, २०२१ च्या पत्रान्वये नागपूर महानगरपालिकेकडे परवानगी मागण्यात आली आहे. यास्तव सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत प्रकल्पाबाबत पुढील कार्यवाही करणे शक्य होणार आहे.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील कळभोंडे गाव मार्गावरील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(४०) * ३४५०७ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील कसारा गावापासून २५ कि.मी अंतरावर असलेल्या कळभोंडे गाव मार्गावरील रस्त्यांची दयनीय अवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याकरिता निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय.

प्रश्नांकित कळभोंडे गावाजवळील सा.क्र.२१/०० ते २३/५०० व २५/८०० ते २८/०० एकूण ४७०० मी. लांबीचे डांबरीकरण व मजबुतीकरणाचे काम मंजूर असून सदर कामे प्राथम्याने पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी निधीची तरतुद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाने जातीचा दावा अवैध ठरलेल्या अधिसंख्य पदावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिलेल्या संरक्षणाबाबत

**(४१) * ३५५८७ डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वोच्च न्यायालयाने दोनदा निर्णय देऊनही राज्य शासन व मंत्रालयातील उच्चपदस्थ सनदी अधिकारी त्या निर्णयाची अंमबजावणी करत

नसल्याने न्यायालयाचा अवमान करीत असल्याचा गंभीर आरोप व बाब निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर नियुक्त झालेल्या व नंतर जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिसंख्य पदावरील अधिकारी / कर्मचाऱ्यांना दिनांक २८ ऑक्टोंबर, २०२१ ला पुन्हा चौथ्यांदा अकरा महिन्याची मुदतवाढ दिली. बेकायदेशीर ठरलेल्या नियुक्त्या वर पगारापोटी सामान्य जनतेच्या करातून या मुदतवाढीने दरवर्षी ६०० कोटी रुपयांची उधळपट्टी केल्या जात असल्याचा आरोप मा.मुख्यमंत्री यांना पाठवलेल्या पत्रात डॉ.धुर्वे, वि.स.स. यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ जुलै, २०१७ व दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी निर्णय दिला असून जातीचा दावा अवैध ठरलेल्या व्यक्तींना दिलेले संरक्षण घटनेतील तरतुदीशी विसंगत ठरत असल्यामुळे कोणतेही सरकार, राज्यशासन, शासन निर्णयाद्वारे अथवा परिपत्रकाद्वारे जातीचा दावा अवैध ठरलेल्या व्यक्तींना संरक्षण देऊ शकत नाही असे सर्वोच्च न्यायलयाने सुस्पष्ट केलेले असताना न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबावणी करण्याच्या आडून संरक्षण दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच शासन निर्णय दिनांक १५ जून, २०२०, दिनांक २७ नोव्हेंबर, २०२०, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१, दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ आणि दिनांक २८ ऑक्टोंबर, २०२१ च्या शासन निर्णयाद्वारे अधीसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांना सेवा व निवृत्तीचे लाभ देण्यासाठी अभ्यासगटाला चौथ्यांदा मुदत दिली आहे काय, असल्यास न्यायालयाचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासगटाला दीड वर्ष लागणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१), (२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ (चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय आणि इतर विरूद्ध जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दि.६.७.२०१७ रोजी सविस्तर निकालपत्राद्वारे निर्णय दिला आहे की, अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती अथवा इतर मागासवर्ग या जातींना

असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही. अशा व्यक्तींना शासकीय सेवेत दिलेले संरक्षण घटनेतील तरतूदींशी विसंगत ठरते.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी विभागाच्या दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे आदेश दिले.

अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत चालू ठेवाव्यात किंवा कसे तसेच त्यांना अनुज्ञेय करावयाच्या सेवा विषयक/ सेवा निवृत्ती विषयक/ सेवा निवृत्ती विषयक लाभांबाबत सविस्तर अभ्यास करुन शासनास शिफारशी करण्यासाठी मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.६.२०२० च्या शासन निर्णयान्वये अभ्यास गट स्थापन करण्यात आलेला आहे. सदर अभ्यास गटाच्या शिफारशी प्राप्त न झाल्याने अधिसंख्य पदावरील कर्मचाऱ्यांना दि.२७.११.२०२० च्या शासन निर्णयान्वये ११ महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानंतर पुन्हा दि.२८.१०.२०२१ च्या शासन निर्णयान्वये ११ महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

आ.डॉ.संदीप धुर्वे यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना पाठविलेल्या पत्राची प्रत या विभागास प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) अधिसंख्य पदावर नेमणूक दिल्यानंतर त्यांना अनुज्ञेय करावयाच्या सेवा विषयक / सेवा निवृत्ती विषयक लाभांबाबत सविस्तर अभ्यास करुन शासनास शिफारशी करण्यासाठी मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.६.२०२० च्या शासन निर्णयान्वये स्थापन केलेल्या अभ्यास गटास दि.१७.२.२०२१ व २३.८.२०२१ च्या शासन निर्णयान्वये दोन वेळा मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

-----------------

## फताटेवाडी (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथील एनटीपीसीच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या रेल्वे उड्डाणपूलाच्या दुरवस्थेबाबत

**(४२) * ३५०१५ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फताटेवाडी (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथील एनटीपीसीच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या रेल्वे उड्डाणपूलाची दुरवस्था झाली असून सदर ठिकाणी दुर्घटना झाल्यास वित्त व जिवीतहानी होण्याची शक्यता असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार चौकशी काय निष्पन्न झाले आहे व त्यानुषंगाने सदरहू उड्डाणपूलाच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही, सद्यस्थितीत सदर रेल्वे उड्डाणपूल सुस्थितीत असून या पूलावरुन सुरळीत व सुरक्षित वाहतूक सुरु आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलास जोडणाऱ्या सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोडचा एमटीएनएल जंक्शन येथील गर्डर कोसळून झालेल्या दुर्घटनेबाबत

**(४३) * ३२५०९ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलास जोडणाऱ्या सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोडचा एमटीएनएल जंक्शन येथील गर्डर कोसळून झालेल्या दुर्घटनेत १४ कामगार जखमी झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सुरक्षा मानक आणि नियमांचे उल्लंघन झाल्याने तसेच अक्षम्य निष्काळजीपणामुळे दुर्घटना घडली असल्याने संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते यांनी मुंबई पोलिसांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरामध्ये मुंबई महापालिकेसह मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) वतीने चालु असलेल्या पायाभूत सेवा सुविधांच्या प्रकल्पाचे सुरक्षा ऑडिट करण्याची मागणी मा. मुख्यमंत्री महोदय यांना निवेदनाव्दारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदर प्रकल्पाचे कंत्राटदार जे. कुमार यांना मुंबई महापालिकेने काळया यादीत टाकले असतानाही दुसरीकडे मात्र मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अनेक कामांचे कंत्राट दिलेले असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दुर्घटनेला जबाबदार असणाऱ्या एमएमआरडीएचे अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच सर्वच पायाभूत सेवा सुविधांचे सुरक्षा ऑडिट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दि. १७ सप्टेंबर, २०२१ रोजी पहाटे ०४.३० वाजताच्या सुमारास मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलास जोडणाऱ्या सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोडच्या एमटीएनएल आर्मवरील स्टील गर्डर कोसळल्यानंतर तेथे काम करणाऱ्या १४ कामगारांपैकी १३ कामगारांना किरकोळ दुखापत झाली, त्यांना प्रथमोपचार देऊन रुग्णालयातून त्वरीत सोडण्यात आले व एका कामगारास सर्व तपासणी अंती, योग्य त्या उपचारानंतर रुग्णालयातून सोडण्यात आले.

(२) होय, गुन्हे दाखल करण्याबाबत मागणी केल्याची बाब खरी आहे.

(३) हे खरे नाही.

तथापि, प्रश्नांकित घटनेच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणीवरील संनियंत्रण, बांधकाम साहित्याची गुणवत्ता इत्यादी मुद्याबाबतचे जन मुक्ती मोर्चा, गोरेगाव मुंबई यांचेकडून मा.मुख्यमंत्री महोदय यांना अग्रेषित केलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(४) एमएमआरडीएकडून सदर प्रकल्पाच्या कामाचे कंत्राट हे निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता झाल्याची खात्री करुन मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांना देण्यात आलेले आहे.

(५) व (६) सदर घटनेसंदर्भात बीकेसी पोलिस स्थानकात कंत्राटदारावर भा.दं.वि.च्या कलम ३३६, ३३७ व ३३८ अन्वये दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी तज्ञ समिती नेमण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजी प्राप्त झाला असून याबाबत तज्ञ समितीने केलेल्या शिफारशींवर एमएमआरडीए च्या सक्षम प्राधिकाऱ्यांद्वारे पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

-----------------

## नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील जातेगावापासून बोलठाणकडे जाणाऱ्या खरोळी नदीवरील पूल वाहून गेल्याबाबत

**(४४) * ३४९७० श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील जातेगावापासून बोलठाणकडे जाणाऱ्या खरोळी नदीवरील पूल नदीच्या पाण्याच्या वेगवान प्रवाहामुळे वाहून गेला, असून नजिकच्या ५ कि.मी. अंतराच्या रस्त्याला ठिकठिकाणी खड्डे पडले असल्यामुळे दळणवळण ठप्प झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामस्थांनी खरोळी नदीपात्रात उतरुन रस्त्याचे व पूलाचे काम तातडीने सुरु करावे या मागणीसाठी दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२१ रोजी आंदोलनही केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जातेगांवपासून बोलठाणकडे जाणा-या खरोळी नदीवरील पूल व डांबरी रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

दि.०२.१०.२०२१ रोजी नांदगाव तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरोळी नदीवरील नविन मंजूर पूलाच्या बांधकामासाठी तयार केलेला वळण रस्ता बाधित झाल्यामुळे वाहतूक ठप्प झाली होती.

(२) होय. हे खरे आहे.

ग्रामस्थांनी खरोळी नदीपात्रात उतरून वळण रस्त्याचे दुरूस्तीचे काम त्वरीत करून वाहतूक सुरळीत करण्याची मागणी केली होती. लेखी आश्वासनानंतर सदर आंदोलन मागे घेण्यात आले.

(३) सद्यस्थितीत रस्त्यावरील उर्वरित खड्डे भरून डांबरीकरणाचे काम प्रगतीवरआहे. सदर रस्त्याचे काम माहे डिसेंबर, २०२१ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच नविन पुलाच्या बांधकामासाठी वळण रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाले असून वाहतूक वळण रस्त्याद्वारे वळविण्यात आली आहे. पुलाचे बांधकाम माहे मार्च, २०२२ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे विक्रोळीतील सूर्य नगर येथील पंचशील चाळीतील सहा घरांवर दरड कोसळल्याबाबत

**(४५) * ३४१२९ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात दिनांक १७ जुलै, २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे विक्रोळीतील सूर्य नगर येथील पंचशील चाळीतील सहा घरांवर दरड कोसळून १० नागरिकांचा मृत्यू झाला व इतर ५ जण जखमी झाले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(४) तसेच दुर्घटनेत मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना व जखमींना शासनाने कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) दिनांक १८ जुलै, २०२१ रोजी मध्यरात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे सूर्यानगर येथील पंचशील चाळीतील घरांवर दरड कोसळल्यामुळे १० नागरिकांचा मृत्यू झाला व २ नागरिक जखमी झाले आहेत.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर दुर्घटनेची चौकशी करण्यात आली नाही.
(४) सदर दुर्घटनेमध्ये मयत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून प्रत्येकी रु.४,००,००/- व मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून प्रत्येकी रु.१,००,०००/- ची मदत वाटप करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र.४ च्या पुणे-सातारा विभागात वाहनांकडून करण्यात येत असलेल्या टोल वसुलीबाबत

**(४६) * ३४५६४ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र.४ च्या पुणे - सातारा विभागात वाहनांकडून गेली ७-८ वर्षे करण्यात येत असलेली टोल वसुली ही बेकायदेशीर

असून करार आणि नियमांचा भंग करून कोट्यावधी रुपयांचा टोल वसूल केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदरहू टोल वसुली बेकायदेशीर असल्यास टोलवसुली बंद करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही.

पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र.४ सहापदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वरील पुणे-सातारा विभागातील टोल नाक्यावरील वसुली ही केंद्र शासनाच्या दिनांक ५.१२.२००८ व दिनांक २६.०८.२०१० च्या अधिसूचनांनुसार व सवलत करारनाम्यातील तरतुदीनुसार दि.०१.१०.२०१० पासून करण्यात येत आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात भटक्या व विमुक्त जमाती यांना नोकरीत पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबत

**(४७) * ३४६३३ श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भटक्या व विमुक्त जमाती यांना नोकरीत पदोन्नती देता येणार नाही असे प्रतिज्ञापत्र राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात सादर केल्याने हजारो भटक्या समाजातील कर्मचारी व अधिकारांमध्ये अन्यायाची भावना

निर्माण झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती व जमातीतीली पदोन्नतीत आरक्षण देता येते तर भटक्या विमुक्तांना आरक्षण देणे असंविधानिक असा सर्वोच्च न्यायालयात उल्लेख करणे म्हणजे दुजाभाव होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भटक्या विमुक्तांचे नोकरीत पदोन्नतीचे अन्यायकारक प्रतिज्ञा पत्र मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१), (२) व (३) राज्यात सर्वप्रथम दिनांक २३ मे १९७४ च्या शासन निर्णयान्वये पदोन्नतीमध्ये अनुसूचित जाती १३ टक्के, अनुसूचित जमाती ७ टक्के व विमुक्त जमाती व भटक्या जमाती ४ टक्के याप्रमाणे एकूण २४ टक्के आरक्षण देण्यात आले होते. त्यानंतर महाराष्ट्र आरक्षण अधिनियम २००१ च्या कलम ५ मध्ये पदोन्नती मधील आरक्षणाची तरतूद करण्यात आली. त्यानुसार दिनांक २५ मे २००४ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती १३ टक्के, अनुसूचित जमाती ७ टक्के, विमुक्त जाती (अ) ३ टक्के, भटक्या जमाती (ब) २.५%, भटक्या जमाती (क) ३.५ टक्के, भटक्या जमाती (ड) २ टक्के व विशेष मागास प्रवर्ग २ टक्के याप्रमाणे एकूण ३३ टक्के आरक्षण पदोन्नतीमध्ये देण्यात आले आहे. आरक्षण अधिनियम आरक्षण २००१ ला माननीय उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आले होते. माननीय उच्च न्यायालयाने ते प्रकरण महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्याकडे वर्ग केले. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई यांनी दिनांक २८.११.२०१४ रोजीच्या निर्णयान्वये महाराष्ट्र आरक्षण अधिनियम २००१ अवैध ठरवून तो रद्द केला. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्या या निर्णया विरोधात राज्य शासनाने माननीय उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्रमांक २७९७/२०१५ दाखल केली. त्यावर माननीय उच्च न्यायालयाने दिनांक ४ ऑगस्ट २०१७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार आरक्षण अधिनियम २००१ च्या वैधतेचा प्रश्न खुला ठेवून पदोन्नतीमध्ये आरक्षण देणारा दिनांक २५ मे २००४ चा शासन निर्णय रद्द केला.माननीय उच्च न्यायालय मुंबई यांच्या दिनांक ४.८. २०१७ च्या

निर्णयाविरोधात राज्य शासनाने माननीय सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. दिनांक २२ मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये माननीय मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्गीयांची पदोन्नती व सरळ सेवेमधील प्रतीनिधित्वा ची व मागासलेपणाची माहिती संकलित करून त्यांचे शासन सेवेतील आरक्षण निश्चित करण्यासाठी समिती गठित करण्यात आली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे दिनांक २९ सप्टेंबर २०२१ रोजी माननीय सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाच्या वतीने शपथपत्र दाखल करण्यात आले होते. त्यानंतर शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार तसेच माननीय सर्वोच्च न्यायालयातील सरकारी वकील व ज्येष्ठ विधिज्ञ यांच्या सल्ल्यानुसार दिनांक १८ ऑक्टोबर २०२१ रोजी राज्य शासनाच्या वतीने सुधारित शपथपत्र माननीय सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. सुधारित शपथपत्रामध्ये आरक्षण अधिनियम ,२००१ अनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) व विशेष मागास प्रवर्ग यांना पदोन्नतीमध्ये देण्यात आलेले आरक्षण कायम ठेवण्याची विनंती मा.सर्वोच्च न्यायालयास करण्यात आली आहे. सदर याचिकेवर माननीय सर्वोच्च न्यायालयत दिनांक १८ जानेवारी २०२१ रोजी झालेल्या सुनावणीत माननीय सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेल्या १० मुद्द्यांवरील सुनावणी पूर्ण झाली असून प्रकरण निकालासाठी राखून ठेवण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत झालेल्या कामांबाबत

**(४८) * ३२४९१ श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत परळी-गुंडा-करंजी-प्रजिमा १८ रस्त्याचे ०७/०० ते ११/५०० व १३/५०० ते २१/५०० मधील

रस्त्यांचे काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्यांवर जागोजागी मोठे खड्डे असून ग्रामस्थ व वाहन चालकांना गैरसोईला सामोरे जावे लागत असल्याने त्याबाबत संबंधित विभागाकडे तक्रारी दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे का,

(३) असल्यास, सदरील कामाची पाहणी गुण नियंत्रण मंडळाने केली आहे, हे ही खरे आहे का,

(४) असल्यास, गुण नियंत्रण मंडळामार्फत कामाची गुणवत्ता तपासणी करून संबंधित कंत्राटदार व अभियंता यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) होय. हे खरे आहे.

२०२१ मधील अतिवृष्टीमुळे सदर रस्त्यावर काही प्रमाणात खड्डे पडले होते. त्याअनुषंगाने गावकरी मंडळी गुंडा व करंजी यांची तक्रार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांचे कार्यालयास दिनांक २९/०९/२०२१ रोजी प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत रस्त्याचा हा भाग दळणवळणासाठी सुरक्षित असून वाहतुक सुरळीत चालू आहे.

(३) होय. हे खरे आहे.

कामाची पाहणी दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचेमार्फत करण्यात आलेली आहे.

(४) काम निकषाप्रमाणे पूर्ण केले असल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने मे.टोरंट पॉवर लिमिटेड कंपनीस आकारलेल्या कर आणि थकबाकीबाबत

**(४९) * ३४८८७ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीद्वारे भिवंडी शहरातील वीज पुरवठ्याकरिता टोरंट पॉवर लिमिटेड नामक खाजगी कंपनी सोबत महाराष्ट्र शासन तसेच भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांच्यासमवेत कर आकारणी संदर्भात करार करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झालेल्या करारानुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने मे.टोरंट पॉवर कंपनीस आकारलेला कर आणि थकबाकी रु.२८५,०४,७२,३१२/- महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.भिनिम-२०१८/पा.क्र.७७/नवि.२३, दिनांक २७ मे, २०१९ अन्वये माफ करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांच्या हितावह तसेच महापालिकेची आर्थिक स्थिती पाहता सदरचा शासन निर्णय रद्द करण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ जुलै, २०२० रोजी मा.मुख्यमंत्री महोदय, दिनांक २ फेब्रुवारी, २०२१ रोजी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा आणि दिनांक ११ फेब्रुवारी, २०२१ रोजी ऊर्जामंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी व मे. टोरंट पॉवर कंपनी यांच्यातील करारानुसार भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात मे. टोरंट पॉवर कंपनी यांच्यामार्फत दिनांक २६.०१.२००७ पासून विद्युत वितरण करण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, भिवंडी शहर महानगरपालिका व मे. टोरंट पॉवर लि. कंपनी यांच्यामध्ये कर आकारणी संदर्भात कोणताही करार झाला नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) राज्य मंत्रीमंडळाने दिनांक २९.११.२०१८ च्या घेतलेल्या निर्णयानुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी महावितरण कंपनीची फ्रेंचायजी मे. टोरंट पॉवर कंपनीवर वितरण रोहित्र, एलटी पोल, एचटी पोल, भूमीगत वाहीन्या यावर आकारलेला मालमत्ता कर रु. २८५.०५ कोटी (चालू मागणी व थकबाकी) यासह भूईभाडे भरण्याबाबतची बजावलेली नोटीस रद्दबातल किंवा निरर्ह करण्यास मंजूरी प्रदान करण्यात आली. सदर निर्णयाच्या

अमंलबजावणीच्या अनुषंगाने नगर विकास विभागामार्फत दिनांक २७.०५.२०१९ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(३) व (४) अशा प्रकारची विविध निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत ही वस्तुस्थिती आहे.

सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका व रिट याचिका दाखल झाल्या असून सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अतिवृष्टीमुळे रस्ते व पुलांची झालेली दुरवस्था

**(५०) * ३३९४१ श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: जळगांव जिल्हयातील पाचोरा-भडगांव, कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मुंबई, ठाणे, पुणे, रायगड इत्यादि अनेक जिल्हयात दिनांक २१ जुलै, २०२१ ते दिनांक २५ जुलै, २०२१ या दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक रस्त्यांचे व पुलांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्यांच्या व पुलांच्या पुनबांर्धणीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या रस्ते व पुलांच्या दुरुस्तीचा प्राप्त प्रस्ताव निकड, निधी व निकषांच्या अधीन राहून मंजूरी प्रदान करण्याचे नियोजन आहे. तथापि, सदर अतिवृष्टीमध्ये नादुरुस्त झालेल्या रस्त्यांवर तात्पुरत्या दुरुस्तीची कामे हाती घेऊन सर्व रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत

ठेवण्यात आले असून वाहतुक सुरळीत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील ८० हजार झोपडयांच्या पुनर्विकासाबाबत

**(५१) * ३२५९०  श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील ८० हजार झोपडयांच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुनर्विकासासंबंधी अधिसूचना जारी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर झोपडपट्टीवासियांचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत कोणत्या ठिकाणी व कधीपर्यंत पुनर्वसन केले जाणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (CSMIA) अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील फेरबदलास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम-१९६६ च्या कलम ३७(१कक)(ग) खाली मंजूरी देणेबाबत दिनांक २९ जून, २०२१ रोजी अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेनुसार विमानपत्तन प्राधिकरणाच्या जागेवरील झोपडीधारकांच्या पुनर्वसनाची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.
(३) व (४) सदर झोपडपट्टी धारकांच्या पुनर्वसनासाठी सद्यस्थितीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्रिमियर कंपाऊंड, कुर्ला (प), मुंबई येथील प्रत्यक्ष जागेवर बांधण्यात आलेली बांधकामे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून “जसे आहे तशा” स्थितीत हस्तांतरीत करुन घेणेबाबतची

कार्यवाही करण्यात आली आहे. सदर झोपडपट्टी पुनर्वसनासाठी आवश्यक त्या इतर जागा/सदनिका उपलब्ध करून घेऊन  पुनर्वसनाची कार्यवाही सत्वर करण्याच्या दृष्टीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण प्रयत्नशील आहे.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेने २७०० मि.मी. व्यासाच्या ब्रिटीशकालीन जलवाहिन्या भंगारात काढल्याबाबत

**(५२) * ३५६५९ ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने २७०० मि.मी. व्यासाच्या ब्रिटीशकालीन जलवाहिन्या भंगारात काढल्या असून १० हजार मेट्रीक टन वजनाच्या जलवाहिन्यांच्या विक्रीतून पालिकेला ३२ कोटी रुपये मिळाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नियमानूसार निविदा न काढता या जुन्या जलवाहिन्यांची विक्री परस्पर करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्याचा भंगार सामानाचा बाजार भाव ४८ रुपये किलो असतानाही सन २०२० नूसार ही विक्री ३२ रुपये किलोने करण्यात आल्याने महापालिकेला १५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने विना निविदेद्वारे विक्री करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने १८०० मि.मी. व्यासाच्या १०,०१८ मेट्रीक टन वजनाच्या ब्रिटीशकालीन जलवाहिन्या भंगारात काढल्या असून, सदर भंगारमालाच्या रु. ३२.२६ कोटी इतक्या रकमेने विक्री करण्याचे काम द्वैवार्षिक करारान्वये नियुक्त कंत्राटदारामार्फत करण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिकेची रुग्णालये, प्रसुतीगृहे, दवाखाने, विभाग कार्यालये व विविध खाती येथील १६ विविध प्रकारच्या भंगारमालाची विल्हेवाट लावण्याकरिता ई-निविदा मागवून माहे डिसेंबर, २०२० ते डिसेंबर, २०२२ अशा कालावधीकरिता स्थायी समितीच्या मंजुरीनुसार कंत्राटदाराची नियुक्ती करुन सदर कामासाठी द्वैवार्षिक करार करण्यात आला.

सदर निविदा/कंत्राटांतर्गत या दोन वर्षांच्या कालावधीत महानगरपालिकेने गृहीत धरलेल्या अंदाजित वजनाच्या भंगारमालाची तसेच त्या कालावधीत निर्माण होऊ शकणाऱ्या अतिरिक्त वजनाच्या भंगारमालाची विल्हेवाट करण्याची तरतूद असल्याने सदर निविदा/कंत्राटान्वये, जलवाहिनीच्या प्रकारासाठी (एम.एस. धातूसाठी) नियुक्त कंत्राटदारास जलवाहिन्या भंगारात काढण्याचे काम स्थायी समितीची मंजुरी घेऊन देण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

सन २०२० च्या ई-निविदा प्रक्रियेनुसार ११ प्रतिसादात्मक निविदाकारांकडून प्राप्त झालेल्या स्पर्धात्मक दरांमधून उच्चतम दरानुसार १६ विविध प्रकारच्या भंगारमालासाठी दर निश्चित करण्यात आले व त्यानुसार द्वैवार्षिक करार करण्यात आला.

सबब निश्चित केलेले दर दोन वर्षांच्या कंत्राट कालावधीसाठी स्थिर असल्याने संबंधित कंत्राटदाराला रु. ३२.२१ प्रति कि.ग्रॅ. इतक्या दराने विल्हेवाट लावण्याचे काम देण्यात आले असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि मे.गरीब नवाज कॉर्पोरेशन व मे.नवाब कॉर्पोरेशन या कंपन्यांनी सदर प्रकरणी

महानगरपालिके विरोधात मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका व त्याअनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात केलेले याचिका/अपील मा.न्यायालयांनी फेटाळले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जानेफळ (जि.बुलढाणा) येथील बायपास मार्गाची दुरवस्था झाल्याने अपघात होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(५३) * ३३४७४ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जानेफळ (जि.बुलढाणा) येथील बायपास मार्गाची दुरवस्था झाली असून जागोजागी मोठ-मोठे खड्डे पडल्याने अपघात होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बायपास मार्गाची तातडीने दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) जानेफळ येथील (जि.बुलढाणा) बायपास मार्गावर काही प्रमाणात खड्डे पडले आहेत, हे खरे आहे.

जानेफळ गावातून जाणारा रस्ता राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी चा भाग म्हणून सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय (MoRTH) मार्फत मंजूर करण्यात आला व त्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.) मार्फत पूर्ण करण्यात आले आहे.

जानेफळ येथील बायपास MoRTH मार्फत मंजूर न झाल्याने त्याचे बांधकाम करण्यात आले नाही. तथापि सद्य:स्थितीत जानेफळ गावातून जाणारा रस्ता राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी ची सुधारणा झाल्याने बहुतांश वाहतूक जानेफळ गावातूनच जात आहे व जानेफळ गावातून वाहतूकीस

कोणताही अडथाळा नाही. त्यामुळे जानेफळ येथील बायपासचा तितकासा वाहतूकीसाठी वापर केला जात नाही. म्हणून सदर बायपासची डागडूजी करण्यासाठी सद्य:स्थितीत आवश्यकता वाटत नाही.

तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.) कडे MoRTH मार्फत सदर बायपास देखभाल व दुरुस्तीसाठी कोणताही निधी उपलब्ध नसल्याने व सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी चा भाग म्हणून मंजुर न झाल्याने सदर मार्गाची देखभाल व दुरुस्ती करणे या विभागामार्फत शक्य झाले नाही. तथापि दुरुस्तीच्या निधीच्या अधिन राहुन भविष्यात सदर बायपासचा वाहतूकीसाठी वापर होईल असे ग्राह्य धरुन खड्डे भरण्याचे काम करण्यात येईल.

सदर रस्त्यावर अपघाताच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आले नाही.

(२) दुरुस्तीच्या निधीच्या अधिन राहुन रस्ता दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील राष्ट्रीय महामार्गावर प्रवासी निवारा व पथदिवे उभारण्याबाबत

**(५४) * ३४०३९ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी या महामार्गावर नॅशनल हायवे ऑथोरिटीने एका वर्षापूर्वी पथदिवे बसवले असून, या पथदिव्यांच्या देखभालीसाठी येथील नगरपालिकेकडे हस्तांतरण केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच अंजनगाव सुर्जी तालुक्यातील परतवाडा ते अकोट ५४८ सी राष्ट्रीय महामार्गावरील येणाऱ्या पांढरी, सातेगाव, चौसाळा, हसनापुर, अडगाव, भंडारज, तुरखेड आदी गावाच्या थांब्यावर प्रवाशी निवारा उभारण्यात आले नसल्याने तसेच उभारण्यात आलेले पथदिवे सुरु नसल्याने अंधारातून मार्ग काढावा लागत असल्याने प्रवाशांची खूप गैरसोय होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन अंजनगाव सुर्जी तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर येणाऱ्या गावामध्ये प्रवाशी निवारा व पथदिवे उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) प्रश्नाशी संबंधित अकोट-अंजनगांव-परतवाडा रा.म.क्र.५४८ सी रस्त्याच्या उन्नतीकरण व पुनर्स्थापनेच्या कामामध्ये अंजनगांव सुर्जी तालुक्यातील पांढरी, सातेगांव, चौसाळा, हसनापूर, अडगांव, भंडारज, तुरखेड गावांच्या थांब्यावर प्रवासी निवारे उभारण्याचे काम समाविष्ट नसल्याने प्रवासी निवारे उभारण्यात आलेले नाहीत.

अंजनगांव सुर्जी तालुक्यातील लखाड व अंजनगांव सुर्जी येथील उभारण्यात आलेले पथदिवे दि.१७.१२.२०२० रोजी ग्रामपंचायत, लखाड व नगर परिषद, अंजनगांव सुर्जी यांना हस्तांतरीत करण्यात आले आहेत. परंतु ग्रामपंचायत, लखाड व नगरपरिषद, अजनगांव सुर्जी यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून सदर पथदिव्यांना विद्युत पुरवठा घेऊन जोडणी केली नसल्यामुळे पथदिवे बंद आहेत. तथापि, सद्यस्थितीत त्यांचेकडून वीज जोडणी करण्यासाठीची आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(३) अंजनगांव सुर्जी तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर येणाऱ्या पांढरी, सातेगांव, चौसाळा, हसनापूर, अडगांव, भंडारज, तुरखेड गावांच्या थांब्यावर प्रवासी निवारा व पथदिवे तसेच अंजनगांव शहरात (VUP) अंडरपास उभारण्याच्या कामाचा केंद्रीय रस्ते परिवहन मंत्रालयाच्या सन २०२१-२२ च्या वार्षिक नियोजन आराखडयामध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार सदर कामे हाती घेण्याच्या दृष्टीने पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हडपसर (जि.पुणे) येथील धोकादायक पुलाबाबत

**(५५) * ३३८८३ श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) रस्त्यावरील मांजरी खुर्द ते मांजरी बुद्रुक ला जोडणारा पूल धोकादायक झाला आहे, हे खरे आहे का,

(२) सदर, पुलाची उंची कमी असल्यामुळे पावसाळ्यात नदीची पातळी वाढल्यास नागरिकांना पुलावरून वाहनांनी रहदारी करण्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे का,

(३) सदर पुलाचे दोन्ही बाजूंचे कठडे तुटलेले आहेत, हे ही खरे आहे का,

(४) असल्यास, शासनाकडून नवीन पूल बांधकाम करिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी तसेच सदर काम किती कालावधीत पूर्ण होणार आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) होय, सदर ठिकाणी अस्तित्वातील पुलाला समांतर नवीन पुल बांधणेस प्रशासकीय मान्यता प्राप्त असून कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत संकल्पन मंजुरीची कार्यवाही पुर्ण झाली असुन पुलाचे काम सुरु करण्यात येत आहे. सदर पुलाचे काम दोन वर्षात पुर्ण करणेचे नियोजन आहे.

-----------------

## परभणी जिल्ह्यात औंढा नागनाथ या राज्यमार्ग व झरी ते आसेगाव फाटा या रस्त्याचे कामाबाबत चौकशी करण्याबाबत

**(५६) * ३३३७२ श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात झरी ते दुधगाव आसेगाव या मार्गे औंढा नागनाथ या राज्यमार्गास राज्य शासनाने काही महिन्यापूर्वी मंजुरी दिली होती व त्यानंतर झरी ते आसेगाव फाटा या दरम्यानच्या १२ किलोमीटर रस्त्याच्या कामासाठी १२ कोटी रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला होता मात्र सद्यस्थितीत या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम काळ्या यादीतील कंत्राटदाराने केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाची वरिष्ठ स्तरावर चौकशी करून शासनाने संबंधितांवर कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन १३ कि.मी. लांबीपैकी ४.०५ कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. ०.९५ कि.मी. लांबीमध्ये काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित ८.०० कि.मी. लांबीमध्ये कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करून काम कार्यान्वयीत करणेचे नियोजन आहे. सद्यस्थितीत सदर लांबीत तात्पुरत्या स्वरूपात दुरूस्ती करण्यात येत असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील आरे वसाहतीतील केल्टीपाडा, चाफ्याचापाडा, गावदेवीपाडा या आदिवासी पाड्यातील आदिवासींचे पुनर्वसन करण्याबाबत

**(५७) * ३२४९८ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडिलोपार्जीत जमीन, पाडे असलेल्या आदिवासींचे पुनर्वसन अन्य ठिकाणी करण्याच्या शासनाच्या निर्णयास मुंबईतील आरे वसाहतीतील केल्टीपाडा, चाफ्याचापाडा, गावदेवीपाडा या आदिवासी पाड्यातील आदिवासींच्या शेकडो कुटुंबियांनी विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरे वसाहतीतील उक्त पाड्यातील आदिवासींचे पुनर्वसन जवळपासच्या इतरत्र जागेवर करुन बिगर आदिवासींचे प्रकल्पग्रस्तांच्या जागेवर पुनर्वसन केले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व उपजीविका जंगलावर अवलंबून असलेल्या अनेक वर्षांपासून पिढयांन पिढया पाड्यांच्या जमिनीवर राहत असलेल्या आदिवासींचे पुनर्वसन इतरत्र करण्याच्या आदिवासींच्या विरोधाच्या अनुषंगाने व शासनाकडे त्यांनी निवेदनाव्दारे केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिलीप वळसे पाटील :** (१), (२) व (३) दिनांक 26.11.2008 रोजी मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर राज्य शासनाने राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या धर्तीवर फोर्स वन कमांडो पथकाची निर्मिती केली आहे. त्यासाठी कृषि, पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य विकास विभागाच्या अधिपत्याखालील आरे प्रशासनाने मुंबई उपनगरात त्यांच्या अखत्यारीत असलेली ९८.६ एकर जमिन गृह विभागाच्या फोर्सवन विशेष सुरक्षा पोलीस पथकासाठी दिली. शासनाने देवू केलेल्या या जागेत पूर्वापार पासून केल्टीपाडा-१, केल्टीपाडा-२ व चाफ्याचा पाडा हे आदिवासी पाडे अस्तित्वात असल्याने प्रत्यक्ष कसरत व कवायती आणि विकसित सुसज्ज यंत्रणासहित प्रशिक्षण या अपुऱ्या जागी अशक्य होत आहे. दारुगोळा, स्फोटके, फायरिंग रेंजच्या प्रशिक्षणाच्या वेळी आजू बाजूच्या वस्तीस धोका पोहोचण्याचा संभव

असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 21.09.2021 रोजी झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार म्हाडामार्फत सदर आदिवासी पाडयांतील पात्र आदिवासींचे पुनर्वसन फोर्स वन च्या नुतन विकास आराखड्यात या प्रयोजनासाठी आरक्षित करण्यात आलेल्या पाच एकरच्या जागेमध्ये करण्याचे नियोजित असून बिगर आदिवासींचे पुनर्वसनPAP अंतर्गत उपलब्ध असलेल्या म्हाडाकडील सदनिकांमध्ये जवळच्या क्षेत्रात करण्याचे नियोजित आहे. त्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि सक्षम प्राधिकरण, अतिक्रमण निष्कासन, यांनी आदिवासी पाड्यांचे सर्वेक्षण करुन आदिवासी व बिगर आदिवासी पात्रता निश्वित करावी व त्यासाठी आदिवासी विकास विभागाचे सहकार्य घ्यावे, असेही सदर बैठकीत ठरले आहे. त्यानुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विभागाचे उप जिल्हाधिकारी यांनी दिनांक 08.12.2021 रोजी बैठक घेतली असुन या बैठकीत फोर्स वन हद्दीतील आदिवासींच्या पुनर्वसनासाठी आदिवासी / बिगर आदिवासी अशी पात्रता/ अपात्रता आदिवासी संशोधन व प्रशिक्षण विभाग यांच्या मदतीने ठरवणेबाबत निश्चित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई इमारत व दुरुस्ती मंडळाच्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासातून मिळालेल्या सदनिका वाटपात झालेला गैरव्यवहार

**(५८) * ३४७१८ श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इमारत व दुरुस्ती मंडळाच्या अखत्यारीत येणाऱ्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासातून मिळालेल्या सदनिका बृहत्सूचीवरील गरजू नागरिकांऐवजी दुसऱ्याच व्यक्तीला देऊन गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, परिणामी म्हाडाच्या पुनर्विकसित इमारतींमधील सदनिकांच्या वितरणास मा.गृहनिर्माण मंत्र्यांनी स्थगिती दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त गैरव्यवहारची संपूर्ण चौकशी करण्यात आली असल्यास चौकशीत काय आढळून आले व दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) हे खरे नाही.

(२) बृहतसुचीवरून गाळे वितरीत करताना सुसुत्रता आणण्याच्या दृष्टिकोनातून कार्यपध्दती ठरविण्यासाठी दि.०२.०७.२०२१ रोजी स्थगिती देण्यात आली होती. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी बृहतसुचीवरील गाळे पारदर्शकपणे वितरण करण्याबाबत दि.२७.०७.२०२१ रोजी परिपत्रक निर्गमित केल्यानंतर दि.०९.०९.२०२१ रोजी स्थगिती उठविण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## म्हाडा मंडळाने ना हरकत प्रमाणपत्र दिलेल्या प्रकल्पांना गती मिळणेबाबत

**(५९)** * **३२५६० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा मंडळाने ना हरकत प्रमाणपत्र दिलेल्या ७९३ पुनर्विकास प्रकल्पातील ५३ प्रकल्प सद्यस्थितीत प्रलंबित असून यापैकी २६ प्रकल्पांचे काम सुमारे १० वर्षापेक्षा अधिक काळ बंद असल्याप्रकरणी म्हाडाने संबंधित विकासकांना दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास कारणे दाखवा नोटीस बजाविण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी ५० टक्क्याहून अधिक प्रकल्पांचे काम बंद असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, यामुळे किती रहिवाशी कुटुबांचे नुकसान झाल्याचे निर्दशनास आले आहे,

(३) असल्यास, उक्त २६ रखडलेल्या प्रकल्पास गती तसेच रहिवाशी कुटुंबाचे पुनर्वसन करण्याकरिता शासनाने तथा म्हाडाच्या मुंबई मंडळातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) तसेच, उक्त प्रकल्प राबविण्यास विकासक तयार नसेल तर अशा वेळी शासनाने त्वरीत प्रकल्प ताब्यात घेऊन स्वत: राबविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) हे खरे आहे. ७९७ पुनर्विकास प्रकल्पांपैकी, १९ प्रकल्पांचे काम सुमारे दहा वर्षापासून रखडल्याचे आढळून आले आहे.

(२) संस्था व विकासक यांच्यामध्ये अंमलात आलेल्या पुनर्विकास करारनाम्यानुसार गाळेधारक/भाडेकरू यांना देय असलेले मासिक भाडे, कॉर्पस फंड वेळेत अदा करणे, पुनर्रचित इमारतीचे बांधकाम वेळेत पूर्ण करणे इ. बाबींची विकासकाकडून वेळेत पूर्तता केली जात नाही. त्यामुळे संस्था व विकासक यांच्यात न्यायालयीन वाद उद्भवल्यामुळे प्रकल्प रखडल्याचे निदर्शनास आले आहे. अशा रखडलेल्या प्रकल्पांमुळे एकूण१०९८ कुटूंबे बाधित झाल्याचे आढळून आले आहे.

(३) रखडलेल्या बांधकाम प्रकल्पांना आर्थिकदृष्टया व्यवहार्य व वर्धनक्षम करण्याकरिता व चालना देण्याकरिता शासनाने दि. २०.०८.२०१९ अन्वये आर्थिकदृष्ट्या दुर्बल(EWS)/ अल्प उत्पन्न गट(LIG) व मध्यम उत्पन्न गट(MIG) करीता अधिमुल्य आकारणीमध्ये अनुक्रमे ५०% व २५% ची सूट व विकास शुल्क (डेव्हलपमेंट सेस ७%) मध्ये पूर्णतः सुट पुढील दोन वर्षांकरीता प्रदान केलेली होती.

तसेच नगर विकास विभागाने दि.१४.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रचलित वि.नि. व प्रो. नियमावलीनुसार अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांकाकरिता जमा होणा-या महसूलामध्ये दि.३१.१२.२०२१ पर्यंत ५०% सूट देण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदरच्या अधिसूचनांमुळे रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना चालना मिळण्यास मदत झालेली आहे.

(४) व (५) उक्त रखडलेले प्रकल्प राबविण्यास विकासक तयार नसल्यास, संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था नवीन विकासकाची नियुक्ती करून किंवा स्वयंपुनर्विकासाद्वारे किंवा म्हाडामार्फत सदरचा पुनर्विकास प्रकल्प राबवू शकतात.

-----------------

## आजरा, चंदगड, भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यामध्ये जंगली टस्कर हत्तींनी शेतकऱ्यांच्या शेतीचे केलेले नुकसान

**(६०) * ३३२३६ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजरा, चंदगड, भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यामध्ये कर्नाटक राज्यातील जंगली टस्कर हत्तींचा मोठ्या प्रमाणात उपद्रव मागील १० ते १२ वर्षापासून सुरू असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याने या टस्कर हत्तींची सिंधुदूर्ग जिल्हयाच्या धर्तीवर कुणकी पध्दतीने पकडण्यांची मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वने मंत्री, मा.प्रधान सचिव वने (विभाग) मुख्य वनसंरक्षक कोल्हापूर (प्रादेशक) यांचेकडे वेळोवेळी बैठका व निवेदने देऊन कार्यवाही करण्याची मागणी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मुख्य वनसंरक्षक (प्रा.) व उप वनसंरक्षक (प्रा.) यांचेकडे वेळोवेळी पाठपुरावा करुनही हत्ती प्रतिबंधाबाबत व कोल्हापूर हद्दीमध्ये प्रवेश बंदीबाबत कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी सुचना केल्या होत्या त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) तसेच, हत्तींकडून होणारी शेतीच्या नुकसानीची नुकसान भरपाई वेळेत उपलब्ध होत नसल्याने शेतक-यांच्यामध्ये वन विभागात विरोधात प्रचंड असंतोषाचे वातावरण निर्माण झाले वा करण्यात येत असुन याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे काय, तसेच मागील गेल्या ५ वर्षात देण्यात आलेल्या नुकसान भरपाईची आकडेवारी काय आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) कोल्हापूर वनविभागात सध्य:स्थितीत चंदगड तालुक्यात नर-२, मादी-१ व पिल्ले-२ तसेच आजरा तालुक्यात नर-१ असे एकूण ६ हत्तींचा वावर आहे. सदर हत्ती चंदगड, पाटणे तसेच भुदरगड परिसरात शेतीचे नुकसान करीत असल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

स्थानिक लोकप्रतिनिधी व कोल्हापूर वनवृत्तातील अधिकाऱ्यांची दिनांक १९.१०.२०२० रोजी पार पडलेल्या बैठकीत हत्ती हाकारा मोहिम राबवून हत्ती येणाच्या मार्गावर Elephant proof fencing करुन हत्ती कोल्हापूर जिल्ह्यात येण्याचे मार्ग बंद करण्याबाबत एकमत झाले.

(२) सन २०२०-२१ मध्ये हत्ती प्रकल्प या केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत प्राप्त रु. २७.०४ लक्ष निधी मधून मानव हत्ती संघर्ष टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक कामे करण्यात आली आहेत. तसेच सन २०२१-२२ करीता रु. १३७.०० लक्षचा आराखडा तयार करुन केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून त्यास अद्याप मंजुरी अप्राप्त आहे.

(३) प्रचलित नियमातील तरतुदीनुसार हत्तींमुळे होणाऱ्या नुकसानीपोटी संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास तात्काळ अर्थसहाय्य अदा करण्यात येते. त्याकरीता उणे (-) प्राधिकाराची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

सन २०१६-१७ ते सन २०२०-२१ या कालावधीत हत्तींनी पिकनुकसान केल्याच्या ४१८५ घटना निदर्शनास आल्या असून त्यामध्ये संबंधित शेतकऱ्यांना रु. २३९.२३ लक्ष, मन्यष्य मृत्युच्या एका घटनेमध्ये मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास रु. १२.०० लक्ष व गंभिर / किरकोळ जखमीच्या ६ घटनांमध्ये संबंधितास रु. ५.७० लक्ष अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम संथगतीने सुरू असल्याबाबत

**(६१) * ३२५३१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे मागील अनेक वर्षापासून चौपदरीकरण करण्याचे काम अतिशय संथगतीने सुरू असल्यामुळे महामार्गावर अनेक ठिकाणी दररोज मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी होवून अपघातांच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर होत असलेल्या सततच्या वाहतूक कोंडीमुळे लाखो लिटर इंधन वाया जात असून नागरिकांना व प्रवाशांना मोठया प्रमाणात शारिरिक, मानसिक त्रास तसेच आर्थिक भूर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामार्गाच्या दहा टप्प्यांचे काम करणाऱ्या ११ पैकी मोजके कंत्राटदार वगळता अन्य कंत्राटदारांनी ६० टक्क्यांपर्यंतही काम केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी महामार्गाचे काम तातडीने पूर्णत्त्वास नेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या पनवेल ते इंदापूर (कि.मी. ० ते कि.मी.८४) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) अखत्यारीत येत असून त्यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे.सदर लांबीतील चौपदरीकरणाचे खाजगीकरणांतर्गत बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या

तत्वावर हाती घेण्यात आलेले काम संथ गतीने सुरु आहे. तथापि सदर उर्वरीत काम पूर्ण करण्याच्या दृष्टिने प्रश्न क्र.४ च्या उत्तरात नमूद केल्यानुसार आवश्यक कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.

तसेच महामार्गावर वाहतूक कोंडी व अपघात होऊ नयेत यादृष्टीने महामार्ग वाहतूक सदृश्य स्थितीत राखण्यासाठी प्राधिकरणाकडून कंत्राटदाराच्या खर्चाने व जबाबदारीवर सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

त्याचप्रमाणे मुंबई-गोवा रा.म.६६ रस्त्याच्या इंदापूर ते झाराप (कि.मी.८४/०० ते कि.मी.४५०/१७०) या एकूण ३५५.२८५ कि.मी.लांबीतील चौपदरीकरणाचे काम राज्य शासनाच्या राष्ट्रीय महामार्ग मंडळ,नवी मुंबई यांचेमार्फत (NH,PWD) हाती घेण्यात आले आहे. सदर लांबीपैकी एकूण २१०.५८० कि.मी. लांबीतील काम पूर्ण झाले असून उर्वरीत १४४.७०५ कि.मी. लांबीतील महामार्गाचे काम प्रगतीत आहे. तथापि प्रगतीपथावरील लांबीपैकी इंदापूर ते वडपाले व पर्शुराम घाट ते वाकेड मधील ११७.३६ कि.मी. लांबीचे काम संथगतीने सुरु आहे. परंतु सदर काम लवकर पूर्ण करण्यासाठी विविध स्तरांवर वेळोवेळी आढावा बैठका घेण्यात येऊन प्रश्न क्र.४ च्या उत्तरात नमूद केल्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच प्रगतीपथावरील काम करताना वाहतूक कोंडी व अपघात होऊ नयेत, यादृष्टीने आवश्यक उपाययोजना करुन काम करण्यात येत असून सद्यस्थितीत महामार्ग सुस्थितीत आहे.

(३) सद्यस्थितीत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत (NHAI) प्रगतीपथावरील चौपदरीकरणाचे काम सुमारे ८८ टक्के पूर्ण झाले असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

तसेच राज्य शासनाच्या राष्ट्रीय महामार्ग मंडळ,नवी मुंबई यांचेमार्फत (NH,PWD) हाती घेण्यात आलेले इंदापूर ते झाराप या लांबीतील १० टप्प्यांतील कामांमधील टप्पा क्र.४(कशेडी ते पर्शुराम घाट),टप्पा क्रं.८ (वाटूळ ते तळगांव), टप्पा क्रं.९ (तळगांव ते कळमठ) व टप्पा क्रं. १० (कळमठ ते झाराप) अशा चार टप्प्यांतील काम जवळपास पूर्ण झाले आहे व

टप्पा क्र.२ (वडपाले ते भोगाव खुर्द), टप्पा क्रं. ३ (भोगाव खुर्द ते कशेडी) या दोन टप्प्यांमधील काम सुमारे ७० टक्के पूर्ण झाले असून उर्वरीत चार टप्प्यांमधील (इंदापूर ते वडपाले व पर्शुराम घाट ते वाकेड) काम प्रगतीत आहे.

(४) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर असलेल्या कामाकरिता सवलत करारनाम्यानुसार मूळ सवलत करार समाप्त करण्याचे आदेश दि.१७.११.२०२१ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. उर्वरीत कामासाठी नवीन कंत्राटदार नियुक्त करण्याची कार्यवाही सुरु असून सदर काम जून २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पनवेल यांनी कळविले आहे.

तसेच राज्य शासनाच्या राष्ट्रीय महामार्ग मंडळ,नवी मुंबई यांचेमार्फत (NH,PWD) हाती घेण्यात आलेल्या कामांपैकी टप्पा क्र. १ (इंदापूर ते वडपाले) व टप्पा क्रं.५ ,पर्शुराम घाट ते आरवली च्या कामांची प्रगती लक्षात घेवून देण्यात आलेल्या मुदतवाढीनुसार सदर काम जून २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे व टप्पा क्र.६,आरवली ते कांटे व टप्पा क्र.७,कांटे ते वाकेड मध्ये उर्वरीत कामांकरीता पर्यायी कंत्राटदार नियुक्त करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली असून त्यानुसार सदर कामे डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) येथील ऐतिहासिक चवदार तलावामध्ये पुराचे पाणी व चिखल शिरल्याबाबत

**(६२) * ३३१८९ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि. रायगड) येथे माहे जुलै, २०२१ मध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे ऐतिहासिक चवदार तलावामध्ये पुराचे पाणी व चिखल शिरल्याने पाणी गढूळ झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चवदार तळ्यामधील कचरा व चिखल काढून तलाव तातडीने साफ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) महाड शहरामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अशा स्वरुपाची परिस्थिती उदभवली होती, ही वस्तूस्थिती आहे.

(२) चवदार तळयातील दुषित पाणी मडपंपाच्या सहाय्याने "डी-वॉटरींग" करुन तसेच तळयातील गाळ काढून तळे स्वच्छ करण्यात आल्याचे महाड नगरपरिषदेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हवेली (जि.पुणे) येथील मुठा नदीचे वाढते प्रदूषण रोखण्याकरिता भुयारी गटार योजना राबविण्याबाबत

**(६३) * ३२७११ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) येथील भुयारी गटार योजनांच्या अभावामुळे महानगरपालिका, जिल्हा परिषद व ग्रामपंचायत हद्दीतील लाखो लिटर सांडपाणी मुठा नदीमध्ये सोडले जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे मुठा नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात प्रदूषित होत असून सदर पाण्याचा पिण्यासाठी वापर होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मुठा नदीचे वाढते प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने भुयारी गटार योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

तथापि, पुणे महानगरपालिकेकडून मुळा-मुठा नदी संवर्धन प्रकल्पाद्वारे नव्याने मैलापाणी शुद्धीकरण केंद्र उभारण्याचे कामासाठी निविदा काढून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमधील निर्माण होणाऱ्या मैलापाण्यामुळे मुठा नदीत होणारे प्रदूषण रोखण्याकरिता मुळा-मुठा नदी संवर्धन प्रकल्प व नव्याने समाविष्ट ११ गावांसाठी मैलापाणी विषयक प्रकल्प राबविण्यात येत आहे. तसेच, पुणे महानगरपालिकेच्या मलनिस्सारण देखभाल व दुरुस्ती विभागामार्फत मुठा नदीतील प्रदूषण रोखण्याकरिता आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

ग्रामीण भागातील सांडपाण्यामुळे नदीचे पाणी काही प्रमाणात प्रदूषित होत असून ग्रामीण भागातील सांडपाणी हे त्याच ठिकाणी ग्रामपंचायतीमार्फत शोषखड्डे, वैयक्तिक कुटुंबाचे शोषखड्डे घेऊन तसेच काही सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एस.टी.पी.) करून योजना राबविण्यात येते. तसेच,ज्या ठिकाणी अंतिम प्रक्रिया करणे प्रलंबित आहे अशा गावांचे नियोजन सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत निधीची उपलब्धता विचारात घेऊन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईतील वांद्रे-वर्सोवा सागरी मार्गाच्या कामाला गती देण्याबाबत

**(६४) * ३३२६९ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे-वर्सोवा हे अंतर केवळ दहा मिनिटांत पार करता यावे यासाठी वांद्रे-वर्सोवा सागरी मार्ग बांधण्यात येत असून या मार्गाच्या बांधकामासाठी सात हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मार्गाचे काम अत्यंत संथगतीने सुरु असून मागील दोन वर्षांत केवळ अडीच टक्केंच बांधकाम पूर्ण झालेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाचा वेग पाहता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने कंत्राटदाराला कारणे दाखवा नोटीस बजावली असून त्या नोटीसद्वारे कामाला गती देण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजी वा सुमारास समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कामाची आताची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे,

(४) आतापर्यंत वर्सोवा-वांद्रे सागरी सेतु प्रकल्पाचे २.०७७% इतके किंमतीचे बांधकाम पुर्ण झाले असून पहिल्या टप्प्यात ५% बांधकाम पुर्ण होणे अपेक्षित होते. परंतु, सदर काम पुर्ण झाले नसल्यामुळे कंत्राटदारास दि.०१.०९.२०२१ पासुन प्रकल्प किंमतीच्या ०.०५% प्रति दिवस इतका दंड आकारण्याचे दि.०७.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये निश्चित करण्यात आले आहे. त्यानंतर कंत्राटातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत कंत्राटदाराने काम पूर्णपणे बंद केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभागातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्याबाबत

**(६५) * ३२५३८ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेअंतर्गत येणाऱ्या दिवा शहरातील पाणीपुरवठा योजनेची विविध कामे प्रलंबित असल्यामुळे तसेच अनेक वर्षापासून दिवा

शहरात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या असतानाही आजमितीस ठाणे महानगर पालिकेमार्फत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबत कोणतीही कार्यवाही होत नसल्यामुळे दिवा शहरवासीयांना पिण्याच्या पाण्यासाठी विविध गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिवा विभागात मागील काही वर्षापासून पाणी टंचाई सुरू असून स्थानिक रहिवाशांना पिण्याच्या पाण्यासाठी नाहक वणवण करावी लागत असल्याने या प्रकरणी लोकप्रतिनिधींनी नगर विकास मंत्री तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा, आयुक्त, ठाणे महानगरपालिका, नगर अभियंता ठाणे महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त, दिवा प्रभाग समिती तसेच अन्य संबंधित सदस्य यांच्याकडे निवेदनाद्वारे तसेच प्रत्यक्ष भेट घेऊन पाणी पाठपुरावा केलेला असतानाही संबंधितांचे दुर्लक्ष झाल्याने मागील एक वर्षापासून नागरिकांना पिण्याचे पाणी मिळावे यासाठी स्वखर्चाने टँकर उपलब्ध करून पाणीपुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिवा शहरासाठी नवीन पाइपलाईन टाकण्याचे काम अत्यंत संथगतीने सुरू असणे, प्रस्तावित जलकुंभांची जागा अद्यापि निश्चित न होणे, दिवा पश्चिमेकडील पाणी पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी पुश थ्रु पद्धतीने करण्याच्या कामाला अद्यापि मंजुरी अप्राप्त असणे, तसेच एमआयडीसीच्या पाईपलाईन वरुन दिवा-साबे करिता स्वतंत्र जलवाहिनी टाकण्याच्या योजनेला सन २०२० मध्ये कार्यारंभ आदेश मिळूनही काम अपूर्णावस्थेत असणे आदी विविध प्रलंबित असलेल्या बाबींमुळे पाण्याचा प्रश्न सोडविण्यास ठाणे महानगर पालिका अपयशी ठरली असून याबाबत आयुक्त, ठाणे महानगरपालिका तसेच अन्य संबंधित अधिकाऱ्यांना लेखी पत्राद्वारे तसेच प्रत्यक्ष भेटून पाठपुरावा करूनही कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभागातील नागरिकांना भासत असलेली पिण्याच्या पाण्याची टंचाई लवकरात लवकर दूर होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) लोकसंख्येच्या प्रमाणात पाणीपुरवठा सुरळीत करण्याकरीता ठाणे महानगरपालिके अंतर्गत दिवा प्रभाग समिती येथील पाणी वितरण व्यवस्थेचे रिमॉडेलिंग करण्याचे काम सन २०१९ पासून सुरु करण्यात आले असून सदर काम प्रगतीपथावर असल्याचे ठाणे महानगरपालिकने कळविली आहे.

तथापि, सद्यस्थितीत दिवा प्रभाग समितीमध्ये दोन प्रभागात ठाणे महानगरपालिकेच्या एका टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असून उर्वरित ठिकाणी खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु असल्याची बाब ठाणे महानगरपालिकने कळविली आहे.

(२) दिवा प्रभाग समिती अंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिनीमधून पाणीपुरवठा केला जातो. सदर जलवाहिनीच्या देखभाल दुरुस्तीचे काम सुरु असून या दरम्यान शटडाऊन, ब्रेकडाऊन तसेच कमी दाबाने पाणीपुरवठा इ. कारणांमुळे पाणीपुरवठा करताना अडचणी निर्माण होत असल्याची वस्तुस्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे. मात्र अशा प्रसंगी महानगरपालिकेकडून दिवा प्रभाग समितीमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

तथापि, दिवा विभागातील पाणी प्रश्न प्रकरणी लोकप्रतिनिधी पाठपुरावा करीत असल्याची बाब ठाणे महानगरपालिकने कळविली आहे. दरम्यान आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्या स्तरावर दिनांक २५.१०.२०२१ रोजी पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी उपाययोजना करणे करीता बैठक पार पडली असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

(३) दिवा प्रभाग समिती अंतर्गत पाणीपुरवठा सुरळीत करण्याकरीता ठाणे महानगरपालिकेमार्फत खालील कार्यवाही सुरु असल्याचे कळविण्यात आले आहे:-

❖ दिवा समिती कार्यक्षेत्रातील पाणीपुरवठा प्रकल्पाची आढावा बैठक दिनांक २५.१०.२०२१ रोजी घेण्यात आली.

❖ सदर क्षेत्रात जलकुंभाची जागा निश्चित करणे अंतर्गत विकास आराखड्यामध्ये असलेली आरक्षणे संपादित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

- ❖ दिवा पश्चिम येथील पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्याकरीता दिवा रेल्वे रुळाखालून पुश-थ्रु पध्दतीने पाईपलाईन टाकण्याकरीता प्रस्ताव रेल्वे खात्याकडे सादर केला असून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
- ❖ दिवा, साबे करीता १००० व ९०० मि.मी. व्यासाची पोलादी जलवाहिनी टाकण्याकरीता सन २०२० मध्ये कार्यादेश देण्यात आला आहे. तथापि, दरम्यानच्या काळात कोविड-१९ महामारीमुळे सदर काम शक्य झाले नसले तरी सद्या संबंधित ठेकेदारास अंतिम आराखडा देण्यात आला असून उपरोक्त कामे सुरु करण्यात येत आहे.
- ❖ पाणी वितरण व्यवस्थेमधील कामे जशी-जशी पुर्ण होत आहेत त्याप्रमाणे सदर यंत्रणा कार्यान्वित करुन पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येत आहेत.

(४) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात दिवा प्रभाग समिती परिक्षेत्रात सुमारे ४४.९० द.ल.लि. प्रति दिन पाण्याची आवश्यकता असून सद्यस्थितीमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुमारे ४२.६५ द.ल.लि पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

भविष्यातील वाढती लोकसंख्या विचारात घेऊन, सदर क्षेत्रात पाणी पुरवठ्यामध्ये सुसुत्रता आणण्याकरीता ठाणे महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे:-

- ❖ ठाणे महानगरपालिकेने पाठपुरावा करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध करुन घेतला आहे. त्यानुसार माहे मे, २०२० पासून ५ द.ल.लि इतका पाणी पुरवठा होत आहे.
- ❖ दिवा, मुंब्रा व कळवा क्षेत्राकरीता सुमारे ५० द.ल.लि प्रतिदिन वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध व्हावा याकरीता महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
- ❖ दिवा प्रभाग समिती अंतर्गत पाणीपुरवठा व्यवस्थेनपेचे सक्षमीकरण हाती घेतले असून सुमारे ३० कि.मी. जलवाहिन्या अंथरण्याचे काम पुर्ण करुन कार्यन्वित करण्यात आले आहे.

- ❖ पाणीपुरवठा रिमोडलींग प्रकल्पाअंतर्गत नव्याने ५ कि.मी.लांबी असलेली जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू असून काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नदींवरील असलेले जीर्ण पूल तातडीने दुरुस्ती करण्याबाबत

**(६६) * ३२७९८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नदींवरील असलेले पूल अतिशय जीर्ण झालेले असून धोकादायक पुलामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील जीर्ण झालेल्या पूलांचे संरचनात्मक तपासणी संबंधित विभागाने केली आहे काय,
(३) असल्यास, जीर्ण झालेल्या पूलांची दुरुस्ती व नूतनीकरण करण्याची मोहीम शासन हाती घेणार आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील नदीवरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) व (३) सर्व पुलांची तपासणी संबंधित क्षेत्रीय अभियंता यांचेमार्फत करण्यात आली आहे. प्राप्त तपासणी निष्कर्षांच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार पुलांची संरचनात्मक तपासणी (Structural Audit) करण्याचे नियोजन आहे.
(४) निधी व निकषांच्या अधीन राहून पुलांची दुरुस्ती करण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत सर्व रस्ते व पुल वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आले असून वाहतुक सुरळीत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निलंगा (जि.लातुर) शहरातील रस्ते विकास कामांना निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(६७) * ३४०१६ श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजने अंतर्गत निलंगा (जि.लातूर) शहर पाणीपुरवठा योजना प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असुन सद्यस्थितीत ७० % पेक्षा जास्त काम पूर्ण झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील व्यवस्थेच्या पाईपलाईनचे काम शहरात केल्यामुळे रस्ते नादुरुस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्ते विकास कामाकरीता अंदाजित रक्कम रु.१०.०० कोटी निधीची आवश्यकता असून विशेष बाब म्हणुन वैशिष्टयपूर्ण योजने अंतर्गत निलंगा नगरपरिषदेस रस्ते विकास करणेसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केलीली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) निलंगा नगरपरिषदला रस्ता अनुदान व वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत निधी मंजुरीबाबत मा. लोकप्रतिनिधींची निवेदने प्राप्त झाली आहेत.

सन २०२१-२२ मधील अर्थसंकल्पित निधी, प्रत्यक्ष वितरणासाठी निधी या बाबी विचारात घेऊन शासन मान्यतेने निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

# बोईसर (ता.जि.पालघर) येथे हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत सुरु असलेल्या कामाच्या चौकशीबाबत

**(६८) * ३४१११ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (ता.जि.पालघर) मतदार संघातील हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत सुरु असलेल्या सफाळे-मांडे ते टेंभीखोडावे, MIDC (ODR-६९) इत्यादी रस्त्यांच्या कामांचा व रस्त्यावरील पाईप मोऱ्यांचा अत्यंत निकृष्ट दर्जा आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामे मेसर्स पालघर रोड प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड ह्या ठेकेदार कंपनीमार्फत सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नमुद केलेल्या कामांची शासनाने पाहणी केली आहे काय तसेच सदरहू ठेकेदार कंपनीने निकृष्ट दर्जाचे काम करण्याऱ्या संबंधित दोषी कंपनीसह अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) नाही, हे खरे नाही.

सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर अंतर्गत हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत MU-०१ पॅकेज मंजूर आहे. त्यामध्ये चार रस्त्याच्या कामांचा समावेश असून सफाळे - मांडे ते टेंभीखोडावे हा तसेच इतर ३ रस्ते सद्यस्थितीत वाहतुकीस सुस्थितीत असून सदर कामांचा दर्जा चांगला आहे.

(२) सदरहू कामे मे. GHV India PVT. Ltd (मेसर्स पालघर रोड प्रोजेक्ट लिमिटेड) या ठेकेदार कंपनीमार्फत सुरु आहेत, ही बाब खरी आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सर्वसमावेशक योजनेतील २० टक्के घरांची विकासकांकडून परस्पर होत असलेल्या विक्रीबाबत

**(६९) * ३५६१० श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वसामान्यांना परवडणारी घरे मिळण्याच्या या हेतूने सुरू करण्यात आलेल्या सर्वसमावेशक योजनेनुसार मुंबई वगळता दहा लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महानगरपालिका क्षेत्रातील चार हजार चौरस मीटरपेक्षा अधिक बांधकाम असलेल्या गृह प्रकल्पांमधील २० टक्के घरे आर्थिक दुर्बल घटकांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घरांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ती म्हाडाला हस्तांतरित करणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही महानगरपालिकांमधील विशेषतः ठाणे, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली तसेच नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील प्रकल्पांमधील अशी घरे विकासक म्हाडाला हस्तांतरीत न करता त्यांची परस्पर विक्री करत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारे किती विकासकांनी घरांची परस्पर विक्री केली आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन त्यानुषंगाने शासनाने संबंधित महानगरपालिकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) बृहन्मुंबई वगळता १० लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकांच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये शासनाने दि.८/११/२०१३ च्या अधिसूचनेद्वारे फेरबदल करुन समावेशक

गृहनिर्माणसाठीचे नियम अंतर्भूत केले होते. त्यानुसार असे गृहनिर्माण बांधून त्यास भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर विकासकाने ताबडतोब, म्हाडाला कळविणे आवश्यक आहे. त्यानंतर ६ महिन्यात म्हाडा सदर घरे विकत घेईल किंवा ज्यांना वाटप करावयाचे आहे अशा लाभार्थ्यांची यादी विकासकास देईल, त्यांना विकासक ती घरे विक्री करेल, अशी तरतुद आहे.

तदनंतर शासनाने दि.०२/१२/२०२० रोजी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजुर केली असुन त्यामधील समावेश योजनेअंतर्गत विकासक / जमीन मालक यांनी नियोजन प्राधिकरणांकडून बांधकाम परवानगी (Commencement Certificate) घेतल्यानंतर सर्वसमावेशक योजनेअंतर्गत परवडणाऱ्या सदनिकांच्या संख्येबाबतची माहिती म्हाडास कळविण्याची व तदनंतर सहा महिन्यामध्ये म्हाडाने लाभार्थ्यांची यादी विकासक / जमिन मालक यांना पाठविण्यात आलेनंतर त्यानुसार विकासक सदर नियमावलीमधील तरतुदीनुसार सदरच्या सदनिकांचे वाटप करेल, अशी तरतूद आहे.

(३) व (४) ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये असे एक प्रकरण निदर्शनास आले आहे. तसेच वसई विरार महानगरपालिकेकडे पाच तक्रारी प्राप्त झाल्या असुन त्यासंदर्भात महानगरपालिकेकडुन शहानिशा सुरू आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिका या दोन महानगरपालिकांमध्ये अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) ठाणे महानगरपालिकेने विकासकाविरूद्ध गुन्हा नोंदविला असुन वसई विरार महानगरपालिकेकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने त्यांचे स्तरावर शहानिशा सुरू आहे. सदर प्रकरणी संबंधित महानगरपालिकेकडून सविस्तर माहिती प्राप्त करून घेऊन उचित कार्यवाही करण्याची शासनाची भूमिका आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वाघाच्या हल्ल्यात झालेली जिवितहानी

**(७०) * ३२६३१ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मानव व वन्यप्राणी यांच्यातील संघर्षामुळे मागील आठ महिन्यांत ५५ व्यक्तींचा मृत्यु झाला असून सर्वाधिक ४१ मृत्यु वाघाच्या हल्ल्यात झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षी राज्यात नऊ महिन्यांत वन्यप्राण्याच्या हल्ल्यात ५३ जणांनी जीव गमावला होता, वाघामुळे ४१, बिबटयाने १०, जंगली डुकरामुळे ३ आणि एकाचा हत्तीच्या हल्ल्यात मृत्यु झाला, सर्वाधिक ४९ मृत्यु विदर्भातील आहेत तसेच ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील परिसरातील गावांमध्ये वाघ-बिबटयाचे सतत हल्ले होत असून गडचिरोली जिल्हयातील आष्टी-इल्लुर परिसरातही बिबटयाच्या हल्ल्यात दोघांचा मृत्यु झाल्याचे निर्दशनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील वन खात्यात मानव-वन्यजीव संघर्ष पराकोटीला पोहचला असून अवैद्य वृक्षतोड, शिकार, यासारखे संरक्षणाचा भार असतांना मागील दहा वर्षापूर्वीचा सुधारीत आकृतीबंधानुसार २० ते ३० टक्क्यानी पदे वाढविणे अपेक्षीत असतांना मागील अनेक महिन्यांपासून विभागीय वनाधिकारी, सहाय्यक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी यांची पदे कमी केल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, एका अधिकाऱ्यांकडे ४-५ क्षेत्राचा कार्यभार दिल्या जात असल्याने संरक्षणाबाबत प्रश्न निर्माण होत असल्याने सदर पदे नविन आकृतीबंधानुसार शासन निर्माण करणार आहे काय,
(५) असल्यास, मृतांच्या वारसांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, मानव व वन्यप्राणी यांच्यातील संघर्ष रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे** : (१) दिनांक ०१ जानेवारी, २०२१ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ या कालावधीत राज्यात मानव-वन्यप्राणी संघर्षात ६५ व्यक्तींचा मृत्यु झाला असून त्यापैकी ३९ व्यक्तींचा मृत्यु हा वाघांच्या हल्ल्यात झाला असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) दिनांक ०१ जानेवारी, २०२० ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीत वाघांच्या हल्ल्यात-३१, बिबट्याच्या हल्ल्यात-१२, जंगली डुक्कराच्या हल्ल्यात-६, अस्वलाच्या हल्ल्यात-५, रानगव्याच्या हल्ल्यात-२, निलगायीच्या हल्ल्यात-२, कोल्हयाच्या हल्ल्यात-२ व इतर प्राण्यांच्या हल्ल्यात-१ असे एकूण ६१ व्यक्तींचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहेत. त्यापैकी विदर्भातील ५० व्यक्तींचा मृत्यु झाला आहे.

दिनांक ०१ जानेवारी, २०२० ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीत चंद्रपूर जिल्हयात २६ व्यक्तींचा वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यु झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

गडचिरोली वनवृत्तातील आलापल्ली वनविभागाअंतर्गत मार्कंडा परिक्षेत्रातील एफ.डी.सी.एम. यांचे ताब्यातील क्षेत्रात दिनांक १५.०९.२०२१ रोजी १ व्यक्ती व आलापल्ली वन्यजीव विभागांतर्गत नियतक्षेत्र ईल्लुर येथे दिनांक ०१.१०.२०२१ रोजी १ व्यक्ती असे एकूण २ व्यक्तींचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग दिनांक १३.०९.२०१९ अन्वये वन विभागाचा गट-"अ" ते गट-"ड" पदांचा सुधारीत आकृतिबंध ठरविण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये विभागीय वन अधिकारी संवर्गातील १३ पदे,

सहाय्यक वनसंरक्षक संवर्गातील २७ व वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गातील १ अकार्यकारी पद निरसित करण्यात आलेले आहे.

(४) अधिकरी उपलब्ध नसल्यास रिक्त पदाचा अतिरीक्त कार्यभार इतर अधिकाऱ्याकडे देण्यात येतो. सुधारीत आकृतीबंधानुसार पद निर्मिती करण्यात आली आहे.

(५) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कायदेशीर वारसास प्रचलित शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार रु. १५.०० लक्ष आर्थिक सहाय्य अदा करण्यात येते. त्याकरीता क्षेत्रीय स्तरावर ऊणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

मानव वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वनक्षेत्रात तसेच वनक्षेत्राजवळच्या भागामध्ये दिवस-रात्र गस्त घालण्यात येते.
- मानव व वन्यप्राणी यांचा संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने जनजागृती करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणवठ्यांची निर्मिती करण्यात येते.
- वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कायदेशीर वारसास तसेच पशुहानी झालेल्या व्यक्तीस प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार तात्काळ नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
- क्षेत्रीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांना ट्रॅन्क्वीलायझर गन / ब्लो पाईप, ट्रॅप कॅमेरा, पिंजरे इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
- वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ११ (१) (क) मधील तरतुदीनुसार व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मानवी जिवितास धोकादायक असलेल्या वन्यप्राण्यांस जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.

-----------------

# सातांक्रुझ (मुंबई) येथील वाकोला शिवाजी नगर रस्त्यावरील मिठी नदीच्या ब्रिटीशकालीन पुलाच्या पुनर्बांधणीबाबत

**(७१) * ३२५९२ श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातांक्रुझ (मुंबई) येथील वाकोला शिवाजी नगर रस्त्यावरील मिठी नदीच्या ब्रिटिश कालीन पुलाच्या पुनर्बांधणीचे काम मागील दोन वर्षापासून प्रलंबितअसल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम १८ महिन्यात पूर्ण करण्याबाबतची मुदत संपुष्टात येऊनही पुलाचे काम संथगतीने सुरु असल्याने पुनर्बांधणी मागील दोन वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुलाच्या कडील रस्ता स्मशानभूमीकडे जाणारा असून सदर पुल झाल्यास नागरिकांना सोईस्कर होणार आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, सदरहू पुलाची पुनर्बाधणी तातडीने पुर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मुंबईतील वाकोला (सांताक्रुझ) येथील पाईपलाईन लगतच्या पुलाच्या पुनर्बांधणीचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये सुरु करण्यात आले आहे.

(२) जागतिक महामारी, मार्च २०२० पासूनची टाळेबंदी, मनुष्यबळ, यंत्रसामग्री व लागणारे बांधकाम साहित्य पूर्ववत करण्यासाठी झालेल्या विलंबामुळे सदर पुलाचे काम मुदतीत पूर्ण होऊ शकले नाही असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) पाईप लाईन लगत असलेला रस्ता सदर पुलावरुन स्मशानभुमीकडे जातो.

सद्य:स्थितीत पाईपलाईन लगतच्या पुलाचे काम प्रगतीपथावर असून सदर पूल माहे डिसेंबर, २०२१ पर्यंत वाहतुकीसाठी खुला होणे अपेक्षित असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धाडगाव (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथे मुसळधार पावसामुळे वन विभागातील शेती तलाव फुटून पिकांचे झालेले नुकसान

**(७२) * ३३५१० श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाडगाव (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथे दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या मुसळधार पावसामुळे वन विभागातील ६ शेती तलाव फुटून शेकडो हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नुकसानीचे शासनाने पंचनामे केले आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी नुकसानग्रस्तांना तातडीने मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) धाडगाव, ता. लोणार, जि. बुलढाणा येथे दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी च्या सुमारास झालेल्या मुसळधार पावसामुळे शेती तलाव फुटलेले नाहीत. तथापि, वन विभागाच्या हद्दीतील ६ मातीनालाबांध अतिवृष्टीमुळे फुटलेले आहेत.
(२) होय.

सदर नुकसानीबाबत संबंधित तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक यांचेमार्फत मौजे धाडगाव, ता. लोणार येथे नुकसानीचे पंचनामे करण्यात आलेले आहेत. त्यानुसार मौजे धाडगावातील एकूण ३९८.०० हे. आर. क्षेत्राचे ३३% पेक्षा जास्त नुकसान झालेले आहे.

(३) महसूल व वन विभागाच्या दिनांक २१.१०.२०२१ व दिनांक २७.१०.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये, बुलढाणा जिल्ह्यास प्राप्त एकूण रु.१००५०.२४ लक्ष निधीपैकी, जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या दिनांक २८.१०.२०२१ व दिनांक २६.११.२०२१ रोजीच्या आदेशान्वये, लोणार तालुक्यास एकूण रु. २४८९.४५ लक्ष निधी वितरीत करण्यात आला. त्यापैकी मौजे धाडगाव, ता. लोणार येथील एकूण ३९८.०० हे. आर. क्षेत्रातील बाधीत शेतकऱ्यांना तहसिलदार, लोणार यांचेमार्फत रु. ३९.८० लक्ष इतके अनुदान वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयात विविध विभागातील लिपिक व चतुर्थश्रेणीची पदे रिक्त असल्याबाबत

**(७३) * ३४०४४ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात राज्य शासनाच्या २६ विभागात लिपिक व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची तब्बल २४२२ पदे रिक्त असल्यामुळे विकासाची कामे प्रलंबित असल्याने दिनांक २४ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यावर कंत्राटी कर्मचारी नेमले असले तरी नियमित कर्मचाऱ्यांची व अनुकंपामध्ये नियुक्ती प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन येथील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३ दिनांक ४ मे, २०२० अन्वये, कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगाच्या प्रादूर्भावामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षांत राज्याची कर व करेतर उत्पन्नातील अपेक्षित महसूली घट व त्याचे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम विचारात घेऊन सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग वगळता इतर विभागांस नवीन पदभरतीवर बंदी आहे.

-----------------

## मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथे ९२ एकर जागेत उभ्या असलेल्या शासकीय वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत

**(७४) * ३३२७० श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथे ९२ एकर जागेत उभ्या असलेल्या शासकीय वसाहतीच्या (शासकीय कर्मचारी निवासस्थान) पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यात २,१२० घरे बांधण्यात येत असून यापैकी ४५० घरांचे काम पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ४५० घरे मे, २०२२ पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सामान्य प्रशासन विभागाला हस्तांतरित करण्यात येणार असून चतुर्थ श्रेणीतील कर्मचा-यांना या घरांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित घरांचे काम कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कायवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे,
वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीच्या भागश: भूखंडावर २१३२ कर्मचारी निवासस्थाने बांधण्याचे काम प्रगतीत आहे. यातील बी-१ या एका इमारतीचे आर.सी.सी. काम पूर्ण झाले असून छतावर पाण्याच्या टाक्यांचे काम प्रगतीत आहे. सी-१ दुस-या इमारतीचे १६ पैकी १३ व्या मजल्याचे आर.सी.सी. चे काम प्रगतीत आहे. सद्यस्थितीत या दोन्ही इमारतींमधील लादीकाम, प्लंबींग, विद्युतीकरण व इतर अनुषंगिक पायाभुत सुविधा कामे प्रगतीत आहे.
(२) हे खरे आहे, मे, २०२२ पर्यंत ४५० घरे पूर्ण करुन सामान्य प्रशासन विभागास हस्तांतरीत करण्याचे नियोजन आहे.
(३) व (४) कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे निविदेच्या मूळ कालावधीत या प्रकल्पाचे काम पूर्ण होऊ शकले नाही.त्यामुळे कंत्राटदारास ऑगस्ट, २०२२ अखेर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या वाढीव कालावधीत काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे. या प्रकल्पाकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व स्तरावर नियमीत आढावा बैठक घेण्यात येत आहे. विद्युत विभागामार्फत विद्युतीकरणाचे काम युध्दपातळीवर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे जलशुद्धीकरण केंद्र जलमय झाल्यामुळे पाणी पुरवठा न झाल्याबाबत

**(७५) * ३४११९ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात दिनांक १७ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे भांडुप जलशुद्धीकरण केंद्र संपूर्ण जलमय झाल्यामुळे मुंबईतील बहुतांश भागात पाणी पुरवठा होऊ शकला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व दोषी व्यक्तींविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच अशाप्रकारच्या दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) दिनांक १७.०७.२०२१ रोजी भांडूप संकुल व संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरात रात्री ३ ते ४ तास सततच्या अचानक झालेल्या अतिवृष्टीमुळे भांडूप संकुल येथील जलशुध्दीकरण केंद्रातील पंपिंग स्टेशनमध्ये पाणी भरल्यामुळे खबरदारीची उपाययोजना म्हणून वीज पुरवठा बंद करावा लागला. त्यामुळे भांडूप संकुल येथून मुंबई शहर व पश्चिम उपनगरास होणारा पाणी पुरवठा काही तासांसाठी बंद झाला होता ही वस्तुस्थिती आहे.

सबब सदर घटना ही नैसर्गिक बाब असल्यामुळे चौकशी करण्यात आली नाही.

तसेच, महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांद्वारे युध्दपातळीवर पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठीची कामे करुन दिनांक १८.०७.२०२१ रोजी संध्याकाळी पाणी पुरवठा पूर्ववत करण्यात आला असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) अशा प्रकारच्या घटना भविष्यात पुन्हा उद्भवू नयेत याकरिता तात्काळ करावयाच्या उपाययोजनांतर्गत उदंचन केंद्रे व जलशुध्दीकरण केंद्राच्या सभोवताली भिंतीचे बांधकाम करणे, ठिकठिकाणी कॉफर डॅम (बांध) उभारणे, पाण्याचा जलदगतीने निचरा करण्यासाठी ट्रेंचेस व पाणी उपसण्यासाठी मोठ्या पंपाची व्यवस्था करणे इत्यादी कामे करुन सदर परिसरामध्ये पाणी शिरणार नाही याची खबरदारी घेण्यात आली आहे.

तसेच कायमस्वरुपी उपाययोजनांसाठी भांडूप संकुल येथील संपूर्ण परिसराचा भौगोलिक व पर्जन्य स्थितीचा अभ्यास करुन प्रतिबंधित उपाययोजना करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली असून, भांडूप संकुल परिसराच्या सर्वेक्षणानंतर सल्लागाराने सुचविलेल्या उपाययोजनांनुसार कामे हाती घेण्यात येत आहेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.